सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ०६ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ६५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ‘समृद्धी महामार्ग पूर्ण, आता शक्तिपीठ महामार्गही करु’

इगतपुरी : समृद्धी महामार्गामुळे नागपूर ते मुंबई हा प्रवास रस्त्यावरुन आठ तासांत पूर्ण करता येणार आहे. समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्यासह संपूर्ण महामार्गाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या प्रकल्पाच्या यशानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गाचे काम पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. शक्तिपीठ मार्गाचे काम करताना जनतेचे प्रश्न समजून घेऊन त्यावर कायद्याच्या चौकटीत राहून उत्तरं शोधली जातील, अशीही हमी मुख्यमंत्र्यांनी दिली. समृद्धी महामार्ग आणि शक्तिपीठ महामार्ग हे दोन्ही रस्ते कार्यरत झाल्यावर राज्यातील सर्व जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. विदर्भ आणि मराठवाड्याला प्रगतीच्या नवनव्या वाटा खुल्या होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शक्तिपीठ महामार्गाद्वारे राज्यातील बारा जिल्ह्यांना आणि तीन शक्तिपीठांना तसेच अनेक मोठ्या धार्मिक स्थळांना जोडले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



विदर्भातली वर्धा जिल्ह्यापासून कोकणापर्यंत ८०५ किमी. लांबीच्या शक्तिपीठ महामार्गाद्वारे वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर,धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना जोडले जाईल. या सहा पदरी महामार्गावर २६ ठिकाणी इंटरचेंज असतील. या रस्त्यावर ४८ मोठे पूल, ३० बोगदे असतील. या मार्गाद्वारे कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवनी, नांदेडची माहूरची रेणुका देवी या शक्तिपीठांना जोडले जाईल. परळी वैजनाथ, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ (नागेश्वर), माहूरची रेणुकादेवी, तुळजापूरची तुळजाभवानी, पंढरपुरचे विठ्ठल रखुमाई मंदिर, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, सोलापुरातील सिद्धरामेश्वर, अक्कलकोट, गाणगापूर, कारंजा (लाड), नृसिंहवाडी, औदुंबर या बारा देवस्थानांना हा महामार्ग जोडणार आहे.

आता महाराष्ट्रातील २४ जिल्हे जेएनपीटीसोबत जोडले गेले आहेत. आता राज्यातील जिल्हे वाढवण बंदराशी जोडण्याचे काम सुरू आहे. समृद्धी महामार्गाने हे काम सुरू केले आहे. समृद्धी महामार्गाच्या पहिल्याचे टप्प्याचे पंतप्रधान मोदींनी, दुसऱ्या टप्प्याचे मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी, तिसऱ्या टप्प्याचे दादा भुसे यांनी आणि अंतिम टप्प्याचे मी उद्घाटन करत आहे. एकूण चार टप्प्यांत तयार झालेल्या समृद्धी महामार्गाचे प्रकल्प पूर्ण करुन लोकार्पण करण्यात आले आहे. या मार्गावर ७३ पूल आहेत. वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी अंडरपास आणि ओव्हरपास करण्यात आले आहेत.

शेवटचा टप्पा ७६ किमी आहे. यामध्ये पाच जुळे बोगदे आहेत. बोगद्यात साठ डिग्री तापमान झाल्यास आपोआप पाणी सुरू होते आणि तापमान कमी झाल्यास आपोआप बंद होते. हे सगळे बोगदे एकमेकांना जोडले आहेत. यात दोनशे मेगावॉट सौर ऊर्जा निर्माण करण्याची तयारी आपण केली आहे. एकूण २२ ठिकाणी सुविधा केंद्र असतील. हा स्मार्ट रोड म्हणून विकसित करण्यात येत आहे. गेल कंपनीने संपूर्ण एक गॅस पाइपलाइन टाकली आहे. त्यामुळे जेवढे उद्योग या रस्त्याच्या बाजूला आहेत तिथे गॅस पुरवला जाईल. गडचिरोली इथे स्टील उद्योगाला गॅस पुरवला जाईल. शिर्डी, अजिंठा अशी ट्रॅफिक दहा लाख प्रति महिना सुरू आहे. ती आधी दोन लाख होती. आता शेवटच्या टप्प्यामुळे यात अजून वाढ होईल. वाशीच्या पुलावर ट्रॅफिक जॅम होते. ते कमी करण्यासाठी वाशीच्या पुलाचे लोकार्पण करत आहोत. जेव्हा काम सुरू केले तेव्हा अनेकांना वाटत होते की हे काम होणार नाही. पण आम्ही ते करून दाखवले. महायुतीच्या काळात याचे काम सुरू केले आणि आनंद आहे की महायुतीच्या काळात याचे लोकार्पण केले आहे. यापुढे आपल्याला शक्तिपीठ महामार्ग करायचा आहे. मराठवाड्याचं आर्थिक आणि औद्योगिक चित्र बदलणारा शक्तिपीठ महामार्ग आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## भारतात तयार होणार राफेल लढाऊ विमानाचे सुटे भाग

नवी दिल्ली : राफेल उत्पादक दसॉल्ट एव्हिएशनने भारत आणि इतर जागतिक बाजारपेठांसाठी लढाऊ विमानांचे सुटे भाग तयार करण्यासाठी टाटा समुहासोबत भागिदारी करार केला आहे. लवकरच हैदाराबादमध्ये एक कारखाना उभारून त्याद्वारे राफेल लढाऊ विमानाचे सुटे भाग तयार केले जातील.

दसॉल्ट एव्हिएशन आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लिमिटेड यांनी भारतात राफेल लढाऊ विमानांच्या सुट्या भागांचे उत्पादन करण्यासाठी चार उत्पादन हस्तांतरण करारांवर स्वाक्षरी केली आहे. या करारांमुळे भारताचे हवाई संरक्षण आणखी सक्षम होण्यास मदत होणार आहे.



भारतात हवाई दलाकडे ३६ राफेल लढाऊ विमानांचा ताफा कार्यरत आहे. या व्यतिरिक्त भारताने नौदलासाठी २६ मरीन राफेल लढाऊ विमानांचा ताफा खरेदी करण्याची तयारी सुरू केली आहे. या सर्व विमानांची देखभाल दुरुस्ती सहजतेने करता यावी यासाठी भारताला राफेलच्या सुट्या भागांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासू शकते. भारत आणि फ्रान्स संयुक्तपणे देशातच राफेलची निर्मिती करण्याबाबत नियोजन करत आहेत. या प्रकल्पालाही सुट्या भागांच्या निर्मितीमुळे मोठी मदत होणार आहे. यामुळेच राफेलच्या सुट्या भागांबाबतच्या कराराला महत्त्व आहे. हैदराबादमध्ये उभारला जाणार असलेला कारखाना भारताच्या विमान उद्योगाला चालना देण्यास मदत करेल.

भागीदारी करारांतर्गत टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स हैदराबादमध्ये राफेलच्या प्रमुख स्ट्रक्चरल सेक्शन्सच्या निर्मितीसाठी एक अत्याधुनिक कारखाना उभारणार आहे. या कारखान्यात विमानाच्या मागील फ्यूजलेजचे पार्श्व कवच, संपूर्ण मागील भाग, मध्यवर्ती फ्यूजलेज आणि पुढचा भाग यांची निर्मिती केली जाईल. पहिला फ्यूजलेज प्रकल्प २०२८ पर्यंत कार्यरत होणार आहे. या कारखान्यामुळे दरमहा दोन पूर्ण फ्यूजलेज मिळतील.

### पर्यावरण दिनाचा मुहूर्त साधून जिल्हाभरात वृक्ष लागवडीस प्रारंभ

## वृक्ष जगवा, माणूस जगेल- जिल्हाधिकारी स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.५ -शुद्ध हवा, शुद्ध पाणी जे जगण्यासाठी नितांत आवश्यक आहे. त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. पैसा, प्रॉपर्टी, मालमत्ता आपल्या मुलांसाठी मागे ठेवतांना त्यांच्यासाठी शुद्ध हवा, पाणी यांचीही तरतूद करुन ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी वृक्ष लावा, वृक्ष जगवा म्हणजेच माणूस जगेल, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज वृक्ष लागवडीसाठी आवाहन केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज जिल्ह्यात वृक्ष लागवड अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. जटवाडा, रहाळ पट्टीतांडा येथे वृक्ष लागवडीचा प्रारंभ करण्यात आला. त्यासोबतच



जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत व शहर हद्दीतही वृक्ष लागवडीस सुरुवात करण्यात आली. जटवाडा रहाळ पट्टीतांडा येथे वन विभाग, १३६ इको बटालियन यांच्यावतीने ३१ हजार वृक्ष लागवड करण्यात आली. या उपक्रमात गायत्री परिवार, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, एनसीसी इ. सहभागी झाले होते. सरपंच छाया चव्हाण, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, कर्नल निर्देश साहा, लेफ्ट. कर्नल अमित प्रभू, मेजर अनिरुद्ध काळे, मेजर प्रमोद बहिरथ, सुभेदार मेजर चंद्रमा सिंग, सुभेदार विष्णू बढिया, नायब सुभेदार देवकर, तहसिलदार रमेश मुनलोड आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा प्रारंभ करण्यात आला. वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या क्षेत्रावर इको बटालियन तर्फे ३ लाख वृक्ष लागवड करण्यात येत असून त्याचा शुभारंभ आज करण्यात आला. पहिल्या दिवशी ३१ हजार वृक्ष लागवड करण्यात आली, अशी माहिती यावेळी देण्यात आली. येथे घनवन पद्धतीने वृक्ष लागवड करण्यात येत आहे. यासोबतच जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने १०० तर नगरपालिका, नगर पंचायत यांनी २०० वृक्ष लागवड करुन ते जगविण्याचे उद्दिष्ट जिल्हा प्रशासनाने दिले आहे. त्याचाही प्रारंभ आज करण्यात आला.

### चकमकीत नक्षली नेता सिंहाचलमचा मृत्यू

गडचिरोली : छत्तीसगडच्या इंद्रावती नॅशनल पार्कच्या जंगलात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत नक्षल चळवळीतील अत्यंत मोठा नेता आणि केंद्रीय समितीचा सदस्य सिंहाचलम याला चकमकीत ठार केले. या नक्षलवाद्याच्या मुसक्याचे राज्यभरात सातत्याने प्रयत्न सुरू होते. अखेर गडचिरोली सीमेपासून जवळच असलेल्या भागात ही मोठी कारवाई घडली. वरिष्ठ माओवादी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकाने नक्षलविरोधी मोहीम सुरू केली, तेव्हा इंद्रावती राष्ट्रीय उद्यानातील जंगलात गोळीबार सुरू झाला होता. सिंहाचलम हा गेल्या ४० वर्षांपासून नक्षल चळवळीत सक्रीय होता.

## रुग्णांची देखभाल करतांना स्वतःचे आरोग्य उत्तम ठेवा- पालकमंत्री शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि.५ - शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, डॉक्टर्स हे अहोरात्र रुग्णांना वैद्यकीय सेवा देतात. हे पवित्र कार्य करतांना डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः च्या आरोग्याची देखभाल करणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यायामशाळा त्यांना उपयुक्त ठरेल, त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, अशा शब्दात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांशी संवाद साधला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी



तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अरविंद गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर तसेच नंदकुमार घोडेले, जिमखाना समन्वक मिर्जा सिराज बेग, विद्यार्थी समन्वक आकांक्षा सिंग, हर्षदा शिरसाठ तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी, डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, येथे योगा आणि जिम सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या रुणालयात आलेला रुग्ण चांगले उपचार घेऊन दुरुस्त होऊन घरी जावा. त्यासाठी आपण त्यांना सेवा देतो. हे करत असतांना आपले शारिरीक व मानसिक आरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे.

### साखर सहसंचालक कार्यालयासमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपोषण



पैठण दि ०६ :- शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांच्यासह शेकडो शेतकरी बांधवांनी प्रादेशिक सहसंचालक साखर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी मिळावी,अद्याप मिळाला नसलेला विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा,पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना साखर कारखाण्याकडून अद्याप मिळाले नसलेले उसाचे बिल व्याजासह शेतकऱ्यांना देण्यात यावे,पैठण तालुक्यात अवकाळी पावसाने झालेले नुकसानाची शेतकऱ्यांना भरपाई द्यावी तसेच कृषी विभागाकडून बंद करण्यात आलेली महा डीबीटी तात्काळ सुरू करून शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ मिळवून दयावा अश्या मागण्या उपोषणकर्त्यांनी ठेवल्या आहेत. मागण्यामान्य होई पर्यंत आमरण उपोषण आंदोलन सुरू राहणार असल्याची माहिती स्वाभिमान शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव ( माऊली ) मुळे यांनी दिली आहे.

## पैठण खरेदी विक्री संघ निवडणुकीत ३३ उमेदवारी अर्ज वैध

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ : पैठण तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाच्या १७ संचालकपदाच्या निवडणुकीत नामनिर्देशनपत्र छाननी दरम्यान एका इच्छुक उमेदवारांनी सूचकचे अनुमोदन नसताना नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. मात्र छाननी प्रक्रिया दरम्यान निवडणूक लढवीत असलेल्या इच्छुक उमेदवाराच्या सूचकानेच आक्षेप घेतल्यामुळे संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याची संचालक दिगंबर गोर्डे यांचा तसेच सहकारी संस्था मतदार संघातून निवडणूक लढविणाऱ्या संघाचे व्हॉ. चेअरमन बळीराम औटे यांच्या एका उमेदवारी अर्ज मध्ये त्रुटी आढळून आल्याने त्यांच्या एक अर्ज वैध तर दुसरा उमेदवारी अर्ज रद्द ठरविण्यात आला आहे.

इतर मागास मतदार संघातील इच्छुक उमेदवार भागचंद शिंदे यांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट नसल्यामुळे यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी बलराम नवथर, सहाय्यक तुषार ख्रिस्ती, योगेश भुकेले यांनी जाहीर केले. दिनांक १८ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्यात येणार आहे. यानंतर उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करून

रविवार दि.२९ रोजी मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत एकूण मतदाराची संख्या १ हजार ३३० एवढी असून. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी जवाहर विद्यालय पाचोड येथे (१)व राजे संभाजी शेतकरी भवन मंगल कार्यालय पैठण येथे (२) असे एकूण तीन मतदान केंद्र निर्माण करण्यात आले. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यावर दुपारी कृषी उत्पन्न बाजार समिती मंगल कार्यालय पैठण येथे मतमोजणी होणार आहे.

विलास बापू भुमरे हे पैठण तालुक्याचे आमदार झाल्यावर त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही पहिलीच निवडणूक असून आमदार विलास बापू भुमरे यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी विकास पॅनल मध्ये वर्णी लागण्या करिता मोठ्या प्रमाणावर इच्छुक उमेदवार प्रयत्नशील आहे. सदरील शेतकरी खरेदी विक्री संघाचा पैठण तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धर्तीवर विकास करण्यासाठी आ.भुमरे यांनी अनेक संचालक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरू केला आहे.

### नाशिकमध्ये भरधाव कार शिरली थेट बंगल्यात; ५ जणांचा मृत्यू

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील कळवण-नाशिक मार्गावर आज भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणारी कार थेट रस्त्यालगत असलेल्या बंगल्यात घुसल्याने ही दुर्घटना घडली. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. कोल्हापूर फाट्यावर हा भीषण अपघात घडला. बुधवारी रात्री १० वाजता हा कार अपघात झाला. या अपघातात नामपूर आणि देवळा येथील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू ओढावला. तर २ जण गंभीर जखमी झाले. प्राथमिक माहितीनुसार, नामपूर येथील भदाण कुटुंबियांच्या नातेवाईकाचे नाशिकमध्ये लग्न होते. त्यासाठी भदाण आणि मेतकर कुटुंबिय नाशिकला आले होते. लग्नानंतर हे सर्व जण कारमधून सटाण्याकडे निघाले होते. नाशिक-कळवण महामार्गावर कोल्हापूर फाटा आला तेव्हा चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्याने कार थेट विठोबा शंकर अहेर यांच्या बंगल्यात घुसवली. ही कार बंगल्यात जाऊन आदळली. अपघात इतका भीषण होता की कारचा चक्काचूर झाला असून बंगल्याचाही काही भाग कोसळला आहे. बंगल्याबाहेरील असलेला सिमेंट खांब वाकून कार आत घुसली. त्यावरून हा अपघात किती भीषण होता हे समोर येते. या अपघातामुळे भदाण आणि मेतकर कुटुंबियावर शोककळा पसरली आहे. अपघात घडताच आजूबाजूच्या लोकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कारमधील अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात आले. तर जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

## पोफळेकरांचे ‘सुर्याय नमः’ : ‘पोफळा’ ठरले मराठवाड्यातील पहिले सौरऊर्जा ग्राम

### जागतिक पर्यावरण दिन विशेष

छत्रपती संभाजीनगर, दि.५ -पर्यावरण संवर्धनाचा एक आयाम शून्य कार्बन उत्सर्जन हा ही आहे. त्यासाठी अपारंपारिक ऊर्जेचा वापर अधिकाधिक होणे आवश्यक आहे. शासन त्यास चालना देत आहेच. ह्या संकल्पनेचे महत्त्व जाणून आजच कृतिशील पावले उचलणाऱ्या संस्थाही आहेत. त्यापैकीच एक एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीस लि. या संस्थेने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा विनियोग करुन फुलंब्री तालुक्यातील पोफळा हे गाव संपूर्ण सौरग्राम केले आहे. संपूर्ण गाव सौर ऊर्जाद्वारे आपली विजेची गरज भागवीत आहे. असे हे मराठवाड्यातील पहिलेच गाव ठरले आहे.

पोफळा ता. फुलंब्री हे तसे लहानसे पण जरासे न्यारे गाव. गावात अवघा ७७ उंबरठा. पण समुद्रसपाटीपासून ७२५ मिटर उंचावर. एन्ड्युरन्स टेक्नॉलीजी या कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून हे गाव संपूर्ण सौर ऊर्जेवर आणण्याचे ठरवले. त्यासाठी महावितरणने त्यांना सहयोग दिला. महावितरणने ह्या गावाचा अधिभार नियमित करण्यासाठी १०० केव्हीचे रोहित्र बसवून दिले. त्यामुळे वीज पुरवठा पुर्णवेळ सुरु राहू शकतो.

गावाने एक होऊन संपूर्ण वीज चोरी बंद केली. त्यानंतर ग्रीड पुरवठा पद्धतीने प्रत्येक घरावर १ केव्ही क्षमतेचे सौर पॅनेल बसविण्यात आले. त्यासाठी प्रति पॅनेल, फिटींग, मिटर बसविणे





असा प्रत्येक कुटुंबासाठी ५१ हजार रुपयांचा खर्च कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून केला. एप्रिल महिन्यापासून संपूर्ण गाव हे सौर ऊर्जेवर शिफ्ट झाले, अशी माहिती एन्ड्युरन्सच्या सामाजिक उपक्रम विभागाचे सहा. व्यवस्थापक उदय दुधगावकर यांनी दिली. या शिवाय गावातील शाळा, जलसंधारण, वृक्ष लागवड अशी इतर कामेही या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून झाली आहेत.

संपूर्ण गाव सौर ऊर्जेवर आल्यामुळे गावातील वीज चोरी पूर्ण बंद झाली. सर्व जोडण्या वैध झाल्या. शिवाय प्रत्येक सौर पॅनेल सोबत घरावर वीज अटकाव यंत्रे, अर्थिंगही लावण्यात आली. त्यामुळे सुरक्षितता आपोआप वाढली.

संपूर्ण सौरग्राम झालेले पोफळा हे गाव संपूर्ण मराठवाडा विभागातील पहिलेच गाव ठरले आहे,असा दुजोरा महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी दिला आहे. आता हीच कंपनी येत्या वर्षात म्हणजेच सन २०२५-२६ मध्ये मुंबापूरवाडी ता. खुलताबाद ह्या गावाला संपूर्ण सौर ऊर्जेवर आणण्यासाठी काम करीत आहे.

अपारंपारिक ऊर्जेचा वापर अधिकाधिक करुन किमान कार्बन उत्सर्जन करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी अपारंपारिक ऊर्जा विभाग कार्यरत आहे. त्याद्वारे अनेक योजना राबविल्या जात आहेत. त्यातही जिल्ह्याने चांगली कामगिरी केली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीद्वारे १२ हजार ७२५ कृषीपंपांना दिवसा वीज

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व भरवशाचा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबवण्यात येत आहे. याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ९ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्यातून १२ हजार ७२५ कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे, अशी माहिती महावितरण कडून प्राप्त झाली आहे.

‘महावितरण’ ने दिलेल्या आकडेवारीनुसार, वैजापूर तालुक्यातील लोणी येथील १० मेगावॅटच्या प्रकल्पातून लोणी, वाकला, चिकटगाव, नायगव्हाण, खरज, तलवाडा व बाभूळल गावातील १६६५ कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. फुलंब्री तालुक्यातील गेवराई गुंगी येथे ५ मेगावॅट प्रकल्पातून गेवराई गुंगी, रिधोरा देवी, कोलते टाकळी, धानोरा व निमखेडा गावातील ८५४ कृषिपंपांना दिवसा वीज दिली जात आहे. सिल्लोड तालुक्यातील अन्वी उपकेंद्रांतर्गत रहिमाबाद येथील ५ मेगावॅट प्रकल्पातून रहिमाबाद व आसडीतील ९०० कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील खोडेगाव उपकेंद्रांर्तत जोडवाडीतील ४ मेगावॅटच्या प्रकल्पातून १ हजार शेतकऱ्यांना वीजपुरवठा होत आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भाविकाकडून तुळजाभवानी चरणी एक लाख रुपये अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जून -**
नांदेड येथील भाविक कमल यादव यांनी श्री तुळजाभवानी मातेच्या गाभाऱ्यातील दानपेटीत गुप्तदान स्वरूपात मोठी रक्कम दिली. ही रक्कम अंदाजे एक लाख रुपये असल्याचे भाविकाने सांगितले.

अनेक दिवसांपासून कृतज्ञतेच्या भावनेने देवीजींच्या चरणी असलेल्या दानपेटीत रक्कम अर्पण करण्याची इच्छा यानिमित्ताने पूर्ण झाल्याचे भाविकाने सांगितले. पुजारी अजय शिंदे यांनी भाविक कमल यादव यांची देवीची पूजाविधी केली. मंदिर संस्थानचे सहायक धार्मिक व्यवस्थापक अनुप ढमाले यांच्या हस्ते त्यांचा देवीजींची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी महेंद्र आदमाने, बिभीषण माने, सुरक्षा निरीक्षक अनिल लोखंडे, सुरक्षा सुपरवायझर योगेश फडके व कर्मचारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांचा सत्कार

**तुळजापूर, दि.५ जून -**
धाराशिव जिल्ह्यातील बेकायदेशीर कत्तलखान्यावर धाराशिव जिल्हा प्रशासनाने कारवाई करत कत्तलखाने मुळा सकट उध्वस्त करुन महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजाभवानीच्या तीर्थस्थानाचे पावित्र्य राखल्याबद्दल धाराशिव जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी कीर्ती पुजार व पोलीस अधीक्षक रितु खोखर यांचे दि.४ जून रोजी धाराशिव येथे जाऊन मनापासून आभार मानले. आई तुळजाभवानीच्या पायाला स्पर्श केलेली कवड्याची माळ त्यांना घालून सुंदर गायी वासराची मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित गोरक्षक शिवशंकर स्वामी मानद पशुकल्यान अधिकारी व दिनेश धनके उपस्थित होते.



### नूतन मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांचा सत्कार

**लोहारा, दि.५ जून -**
लोहारा येथील नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांची प्रशासकीय स्तरावरुन इतरत्र बदली झाल्याने त्यांच्या जागी नवीन मुख्याधिकारी म्हणून लक्ष्मण कुंभार यांनी नुकताच नगरपंचायतीचा दि.४ जून रोजी पदभार घेताच येथील कर्मचारी व कामाचा आढावा घेत अनेक कामावर प्रत्यक्षात भेटी देत अपुर्ण कामे पूर्ण करण्या बाबत कारवाईचे आदेश दिले. यावेळी लक्ष्मण कुंभार यांनी पदभार घेताच उबाठा शिवसेनेचे तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, माजी नगरसेवक दिपक मुळे, शाम नारायणकर, हरीभाऊ लोखंडे, शहरप्रमुख सलीम शेख, सुधीर घोडके, महेबुब गवंडी, रघुवीर घोडके, आदीने त्यांचा यथोचित सत्कार केला.



### लोहाऱ्यात शांतता कमिटीची बैठक संपन्न

**लोहारा, दि.५ जून -**
बकरी ईद हा सण शांततेत साजरा करावा असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांनी केले. लोहारा पोलीस ठाण्याच्या प्रांगणात दि.४ जून रोजी बकरी ईदच्या अनुशंगाने शांतता कमीटीची बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे, पोलीस उपनिरीक्षक सचिन केंद्रे यांची प्रमुख म्हणुन उपस्थित होती. या बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे यांनी मार्गदर्शन करुण कांही सुचना केल्या. यावेळी अभिमान खराडे, हाजी अमीन सुंबेकर, अमोल बिराजदार, सलिम शेख, आयुब शेख, हाजी बाबा शेख, आरिफ खानापुरे, प्रशांत काळे, इकबाल मुल्ला, सहदेव गिराम, दादासाहेब मुर्टे, माधव कोळी, यांच्यासह नागरिक, पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शिरगापुर येथे होळकर जयंती साजरी

**इटकळ, दि.५ जून -**
तुळजापुर तालुक्यातील शिरगापुर येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती जल्लोषात व आनंदात साजरी करण्यात आली. सोमवार दि.२ जुन रोजी सायंकाळी ५ ते १० या वेळेत अगदी शांततेत मिरवणूक पार पडली. प्रतिवर्षा प्रमाणे शिरगापुर गावातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व नागरिकांनी सहभाग घेतला. सरपंच डॉ. कल्पना जाधव यांच्या हस्ते महाआरती करून मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मिरवणूक शांततेत पार पडली.

### प्रभावती रोचकरी यांचे निधन

**तुळजापूर, दि.५ जून -**



माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी यांच्या मातोश्री प्रभावती ज्ञानोबा रोचकरी (वय ७६) यांचे बुधवार दि.४ जून रोजी पहाटे अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार विवाहित मुली, एक मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर बुधवार दुपारी बारालिंग परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## देवेंद्र फडणवीसांचा महत्वाकांक्षी प्रकल्प : १०० किलोमीटर बोगदा प्रस्तावित...

# कृष्णेच्या पुराचे पाणी लवकरच मराठवाड्यात येणार

### तीन महिन्यात प्रकल्प व्यवहाराता अहवाल देण्याचा निर्णय : 'मित्रा'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...



### मराठवाड्याला ४० टीएमसी पाणी मिळणार...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे होणाऱ्या या प्रकल्पामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील पुरस्थितींवर नियंत्रण करता येणार असून शेत जमिनीचे, पिकांचे व जीविताचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होणार आहे तर दुसरीकडे बीड, धाराशिव या दुष्काळग्रस्त भागांना ४० टीएमसी पाणी उपलब्ध होऊन लाखो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन शेती उत्पादनात वाढ. स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवून आर्थिक विकासाला चालना मिळणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जून -**
पावसाळ्यात समुद्रात वाहून जाणारे कृष्णेचे ४० टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यात आणण्यासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प आखण्यात येत आहे. दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रातून वाहून जाणारे हे पाणी १०० किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव आहे. आणि त्यानंतर हे ४० टीएमसी पाणी बीड, धाराशिव, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांमध्ये वितरित केले जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य देऊ केले असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरस्थितींवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी आणि मराठवाड्यातील दुष्काळी भागांना जलसंपत्ती उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाअंतर्गत, कृष्णा खोऱ्यातील पूरस्थितीतून दरवर्षी वाहून जाणारे अंदाजे ४० टीएमसी पाणी १०० किलोमीटर लांबीच्या बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या साहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव आहे. २०१९ साली कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये आलेल्या भीषण पुरानंतर, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे पुराचे पाणी समुद्रात न जाऊ देता, त्याचा उपयोग दुष्काळग्रस्त भागांच्या सिंचनासाठी करणे आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी मित्र संस्थेच्या 'कृष्णा पुरनियंत्रण प्रकल्प' अंतर्गत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यासाठी राज्य शासनाकडून ९६३ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, आणि जलवाहिनी प्रणाली सुधारण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. तर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, पुराचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये वळविण्याची योजना आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष आ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'कृष्णा पूर नियंत्रण प्रकल्प' बाबत महत्वाची बैठक पुणे येथील महाराष्ट्र कृष्णखोरे विकास महामंडळ कार्यालयात सोमवार २ जून रोजी पार पडली.

बैठकीत सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरपरिस्थितीवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी हे अधिकचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागाला देण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

जागतिक बँकेचे तांत्रिक सल्लागार या प्रकल्पाचा 'प्रकल्प व्यवहार्यता अहवाल' पुढी तीन महिन्याच्या आत सादर करणार असल्याचेहे आमदार पाटील यांनी म्हटले आहेयावेळी कृष्णा खोरे महामंडळचे कार्यकारी संचालकअतुल कपोले, सचिव वी.एम. कुलकर्णी, मुख्य अभियंता गुणाले, मुख्य अभियंता धुमाळ, उपसचिव सविता बोधेकर, अधीक्षक अभियंता शिल्पा जाधव (पाणी तंटा लवाद पुणे) अधीक्षक अभियंता कोल्हापूर अभिजीत मेत्रे, कृष्णा मराठवाडा प्रकल्प अधीक्षक अभियंता थोरात, कार्यकारी अभियंता नाईक उपस्थित होते.

## पवनचक्कीचे अधिकारी गेंड्याच्या कातडीचे; भर पावसातही शेतकऱ्यांच्या जमिनीची नासधूस





**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.५ जून -**
तालुक्यात पवनचक्की चा सुरू असलेला गोंधळ थांबण्याचे नाव घेत नाही. कधी शासनाची नुकसान तर कधी शेतकऱ्यांची नुकसान पवनचक्कीकडून केली जात आहे. याबाबत नागरिकांनी तक्रारी देऊन देखील कारवाई होत नाही. त्यामुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तर पवनचक्कीचे अधिकाऱ्यांना कसलीही कोणाची मया-दया येत नाही. अधिकाऱ्यांनी गेंड्याचे कातडे पांघरले आहे.

असाच तालुक्यातील तेरखेडा येथील एक नुकसानीचा प्रकार समोर येत आहे. कडकनाथवाडी रस्त्यापासून काही अंतरावर एका कंपनीचे दोन पॉईंट आहेत. उन्हाळ्यात या पवनचक्कीचे काम सुरू झाले होते. अमर्यादित काम असल्याने उन्हाळ्यात हे काम पूर्ण झाले नाही. सध्या पावसाळा सुरू झाला असून अनेक भागात अवकाळी पावसाने मागील आठवड्यात थैमान घातले होते. त्यामुळे शेतशिरात सर्वत्र पाणीच पाणी साचले होते.

वापसा झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आता पेरणीसाठी मशागत सुरू केली आहे. मात्र पवनचक्कीच्या कामामुळे शेतकऱ्यांना शेतीची मशागत करता येत नाही. पवनचक्क्याकडून साहित्याची वाहतूक करणारी अवजड वाहनं शेतकऱ्यांच्या शेतात घातली जाते.



त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. वाहने फसल्यामुळे जेसीबी व पोकलेन आणून ही बाहेर काढावी लागतात. त्यावेळी जमिनीचा तुडवा होऊन जमिनीचा पोत खराब होत आहे.

परिणामी उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता शेतकरी सांगतात. इतकी मोठी नुकसान होत असताना पवनचक्कीच्या अधिकाऱ्यांना मात्र कसलीही शेतकऱ्यांची दया-माया येत नाही.

अधिकाऱ्यांनी गेंड्याचे कातडे पांगरल्यामुळे शेतकऱ्याची त्यांना किंमत कशी कळणार असे शेतकरी सांगतात.

## कुन्सावळी पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण

### फायनल बील मंजूर करू नये : सरपंच व ग्रामसेवकांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ जून -**
कुन्सावळी (ता. तुळजापूर) येथील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम अद्याप अपूर्ण असून, या अपूर्ण कामाचे फायनल बील मंजूर करण्यात येऊ नये, अशी मागणी सरपंच पांडुरंग शिंदे व ग्रामसेवक एम. व्ही. स्वामी यांनी तुळजापूर येथील जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंत्यांकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, कुन्सावळी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत करण्यात आलेले पाण्याची टाकी, पाईपलाईन, वॉलचे बांधकाम तसेच सिमेंट काँक्रिट काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

प्रत्यक्षात हे काम अर्धवट असताना संबंधित शाखा अभियंता गुड्डे व नायगावकर यांनी खोट्या हस्तांतरण पावत्या दाखवून व खोटे निवेदन देऊन फायनल बील तयार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

काम अपूर्ण असताना फायनल बील तयार करणे ही प्रशासकीय फसवणूक असून ग्रामपंचायतीच्या तसेच गावकऱ्यांच्या विश्वासाला तडा जाणारा प्रकार आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सदर फायनल बील रद्द करून तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शिंदे व स्वामी यांनी केली आहे.

या निवेदनावर सरपंच पांडुरंग शिंदे व ग्रामसेवक एम.व्ही. स्वामी यांची स्वाक्षरी असून, यामध्ये गावकऱ्यांच्या अपेक्षा व कामाच्या दर्जाविषयी नाराजी स्पष्टपणे व्यक्त करण्यात आली आहे.

**✻ तुळजापूर, दि.५ जून -**
तुळजाभवानी मंदिरात ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर समितीमार्फत देण्यात आलेल्या माहितीनुसार, दि.९ जून रोजी सोमवार रात्री छबिनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर १० जून रोजी रात्री छबिना व जोगवा, तर ११ जून रोजी पुन्हा छबिना होणार आहे.

### सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज पुण्यस्मरणार्थ चाकरवाडी येथे रौप्य महोत्सवी सोहळा

## कळंब येथून १००१ पोते साखर अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ जून -**
सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे रोप्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह, श्री ज्ञानेश्वरी पारायण व शिवमहापुराण कथा यज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दिव्य सोहळ्यासाठी कळंब येथील माऊली भक्तांकडून १००१ पोते साखर अर्पण करण्यात येत आहे.

या उपक्रमाची संकल्पना डॉ. लक्ष्मणराव जाधवर यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब येथील अनेक सद्भक्तांनी साखर संकलनात भाग घेतला. आज दिनांक ५ जून रोजी जाधवर हॉस्पिटलसमोर ४०१ पोत्यांचा शेवटचा टप्पा चाकरवाडीसाठी रवाना झाला. यापूर्वी ३००-३०० पोत्यांचे दोन टप्पे पाठवले गेले होते.

साखर भरलेल्या ट्रकचे नारळ फोडून पूजन डॉ. लक्ष्मणराव जाधवर, तहसीलदार हेमंत ढोकले आणि उपस्थित माऊली भक्तांच्या हस्ते पार पडले. ट्रक नारळाच्या फांद्या व पुष्पहारांनी सजविण्यात आले होते. या प्रसंगी संत ज्ञानेश्वर माऊली महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्याचबरोबर डॉ. जाधवर यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

गेल्या २५ वर्षांपासून डॉ. जाधवर आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून दरवर्षी १०१ क्विंटल साखर चाकरवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहासाठी पाठविली जाते. यंदा रौप्य महोत्सवानिमित्त हा संकल्प १००१ पोत्यांपर्यंत नेण्यात आला.

यावेळी उपस्थित प्रमुख भक्तांमध्ये युवराज मुरकुटे, राजाभाऊ ओझा, अशोकराव बोराडे, सुरेश टेकाळे, विजय गुंजाळ, डॉ. अभिजीत व डॉ. अविनाश जाधवर, विशाल व नाना जाधवर, प्रा. व्ही.एस. जाधवर, राजेंद्र बिक्कड, प्रा. दिलीप पाटील, शरद जाधवर, अजय देशमुख, पांडुरंग गुरव, शाम नरवडे, ज्ञानेश्वर पतंगे, रमेश आंबीरकर, माधवसिंग राजपूत, बालाजी सुरवसे यांचा समावेश होता.

# उमरग्यात प्रशासकीय विकासाला गती; मात्र पंचायत समिती इमारतीकडे दुर्लक्ष







### नागरिकांची विद्यमान आमदारांकडे अपेक्षा...

प्रशासकीय सुविधा वाढत असताना पंचायत समिती इमारत मात्र दुर्लक्षित राहणे दुर्दैवी आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही इमारत अत्यावश्यक आहे. आमदारांनी याकडे लक्ष द्यावे आणि तातडीने नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करावा.
**- विजय वाघमारे,** जिल्हा सरचटणीस, काँग्रेस

आधीच्या आमदारांनी अनेक चांगली कामे केली, ती स्वागतार्ह आहेत. मात्र पंचायत समिती ही प्रशासनाचा मुख्य केंद्रबिंदू असून ती मागे राहणे गंभीर बाब आहे. सध्याच्या आमदारांनी ही तर कामे चांगली करून घ्यावी व या कामाला प्राधान्य द्यावे.
**- अशोक बनसोडे,** नागरिक उमरगा

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.५ जून -**
उमरगा शहरात मागील काही वर्षांत प्रशासकीय विकासाला वेग आला असून न्यायालय, तहसील, उपविभागीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह अशा अनेक महत्त्वाच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. हे सर्व माजी आमदारांच्या प्रयत्नातून शक्य झाले.

त्यामुळे नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवा उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

मात्र या सगळ्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर पंचायत समितीची इमारत मात्र उपेक्षित राहिली आहे. १९६२ मध्ये बांधलेली जुनी इमारत जीर्णावस्थेत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

कर्मचाऱ्यांना अपुऱ्या जागेत काम करावे लागत आहे, तर नागरिकांनाही मूलभूत सुविधा मिळत नाहीत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विद्यमान आमदारांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी आणि नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करून तातडीने काम सुरू करावे, अशी मागणी केली आहे. उमरग्याचा सर्वांगीण आणि समतोल विकास साधण्यासाठी पंचायत समितीची नवी इमारत उभारणे काळाची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

या मागणीला पुढील काळात काय प्रतिसाद दिला जातो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## एमजीएममध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.५ महात्मा गांधी मिशन विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्माण करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसमोरील परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधितांनी सहभाग घेतला. या वृक्षारोपण उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरणाविषयीची जाणीव वाढवण्याचा संदेश देण्यात आला. एमजीएम विद्यापीठाचा परिसर हरित असून यामध्ये विविध प्रकारची वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत. विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करून पर्यावरणपूरक दृष्टिकोन रुजवण्यावर भर दिला जातो.

## अल्ट्रा झकास ओटीटीवर भरणार अभिनयसम्राट 'पद्मश्री अशोक सराफ' यांचा चित्रपट महोत्सव

मुंबई – अशोक सराफ... नाव उच्चारलं की डोळ्यांसमोर उभा राहतो एक हसमुख चेहरा, धमाल विनोद, गावरान माणुसकीनं ओतप्रोत भरलेला कलाकार आणि आता त्याच्या नावापुढे लागलीय एक खास ओळख पद्मश्री अशोक सराफ भारत सरकारकडून नुकताच त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला आणि तोही फक्त पडद्यावरच्या कलाकृतींसाठी नाही, तर त्यांच्या अभिनयामधून घडलेल्या संवेदनशील, माणसासाठी! हा पुरस्कार जेव्हा मिळतो तेव्हा कलाकार फक्त अभिनय करत नाही, तर जनतेच्या हृदयात आपली जागा बनवतो. मुळात नुसतं स्टार होणं सोपं असतं, पण मामा बनून घराघरात माणसाच्या मनात घर करणं हे फक्त अशोक सराफसारख्या कलाकारालाच जमलं. म्हणून त्यांच्या कलेला मानवंदना देऊन अल्ट्रा झकास घेऊन आलंय 'अशोक मामा चित्रपट महोत्सव'. रंगभूमीवरून प्रवास सुरू करून मामांचा छोट्या पडद्यावरून बॉलिवूडपर्यंतचा टप्पा म्हणजे मेहनतीचं आणि जबरदस्त टॅलेंटचं जिवंत उदाहरण.साऱ्यांनी त्यांच्या अभिनयातून हसणं शिकलं, आणि आयुष्यात संकटं आली तरी माणसाने माणसाशी नातं कसं जपायचं हेही त्यांनी शिकवलं. अशोक मामांचा जगभरात गाजलेला अशी ही बनवाबनवी चित्रपट तर सगळ्यांना माहितीच आहे, पण ह्या वेळी आम्ही घेऊन आलोय काही निवडक खास सिनेमे जे तुमचं मन जिंकल्याशिवाय राहणार नाहीत. पाहूयात कोणते आहेत ते सिनेमे

## न्यू निस्सान मॅग्नाइट सीएनजी रिट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध

अहमदनगर – निस्सान मोटर इंडियाची लोकप्रिय एसयूव्ही न्यू निस्सान मॅग्नाइट आता सरकार–मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध असेल. सीएनजी किट देशाच्या नियामक मानकांनुसार मोटोझेन (तृतीय पक्ष) द्वारे पूर्णपणे विकसित, उत्पादित आणि गुणवत्ता हमीसह असेल. मोटोझेन किटमधील घटकांसाठी वॉरंटी देईल. या उपक्रमातून ग्राहक–केंद्रित उपाययोजना प्रदान करण्यावर भर दिला जाईल. या किट्सचे फिटिंग सरकारी मान्यताप्राप्त फिटमेंट केंद्रांवर केले जाईल. संपूर्ण रेट्रोफिटमेंट फक्त ७४,९९९ रुपयांच्या स्पर्धात्मक अतिरिक्त किमतीत उपलब्ध असेल. शाश्वततेबद्दल आणि पर्यावरणाविषयी जागरूक ग्राहकांसाठी या पर्यावरणपूरक सीएनजी किट फिटमेंटची अंमलबजावणी देशभरात टप्प्याटप्प्याने केली जाईल. पहिल्या टप्प्यात निस्सानचे ग्राहक दिल्ली–एनसीआर, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, केरळ आणि कर्नाटक या ७ राज्यांमधील निस्सान अधिकृत डीलरशिपद्वारे सीएनजी किट बसवून घेऊ शकतात. दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून नंतर ते देशभरातील इतर राज्यांमध्ये विस्तारित केले जाईल.

## बोसॉन सेलने भारताला ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले

मुंबई – – देशातील पहिली स्वदेशी लिथियम सेल उत्पादक कंपनी, बोसन सेल्सने अधिकृतपणे त्यांची दोन नवीन उत्पादने – १८३५० बी–३०ए आणि २१७०० बी–५०ए प्रकार लाँच केली आहेत. हे उच्च–कार्यक्षमता असलेले, किफायतशीर पॉवर सेल आता संपूर्ण भारतात उपलब्ध असतील. भारताला ऊर्जा स्वावलंबन आणि अक्षय ऊर्जेच्या दिशेने अधिक सक्षम बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, जे पंतप्रधानांच्या 'आत्मनिर्भर भारत'च्या आवाहनाला बळकटी देते. बोसॉन सेल आता भारताच्या वेगाने विकसित होणाऱ्या लिथियम तंत्रज्ञानाचा कणा बनला आहे, जो जागतिक स्तरावर देशाची एक नवीन ओळख निर्माण करेल.२०३० पर्यंत भारतातील लिथियम–आयन बॅटरी बाजारपेठ ९.५६ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

## लोकप्रिय वैयक्तिक काळजी ब्रँडची उपलब्धता वाढवली

पुणे – मीशोने जागतिक स्तरावर प्रसिद्ध वैयक्तिक काळजी कंपन्यांशी भागीदारी करून त्यांच्या वैयक्तिक काळजी उत्पादनांची श्रेणी वाढवली आहे, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना त्यांच्या आवडत्या सौंदर्य आणि वैयक्तिक काळजी उत्पादनांमध्ये प्रवेश करणे सोपे झाले आहे. ग्राहक आता प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया (पी अँड जी इंडिया) ब्रँड जसे की पॅम्पर्स, व्हिस्पर, हेड अँड शोल्डर्स, पॅन्टीन आणि जिलेट, हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड (एचयूएल) ब्रँड जसे की पॉन्ड्स, डोव्ह, व्हॅसलीन, एले १८, सनसिल्क, क्लिनिक प्लस, इंदुलेखा, पिअर्स, लक्स आणि ट्रेसेमे आणि हिमालय ब्रँडची उत्पादने मीशो मॉलमधून त्यांच्या दाराशी ऑर्डर करू शकतात.

## हॅरियर.ईव्ही ने एसयूव्ही ची एक नवीन धाडसी लीग सुरु

मुंबई : भारतातील इलेक्ट्रिक वाहन क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या आणि एसयूव्ही विभागातील आघाडीच्या उत्पादक टाटा मोटर्सने आज भारतातील सर्वात शक्तिशाली, सर्वात सक्षम आणि सर्वात बुद्धिमान एसयूव्ही – हॅरियर.ईव्ही लाँच केली. भविष्यातील एसयूव्ही म्हणून डिझाइन केलेली, क्रीीळशी.र्शीं एका नवीन संकल्पनेचे उदाहरण देते – क्षमता आणि अत्याधुनिकतेचे एक अद्वितीय मिश्रण. ही एक अशी एसयूव्ही आहे जी तुम्हाला साहस आणि लक्झरी यापैकी एक निवडण्याची सक्ती करत नाही – ती दोन्हीचा आनंद देते. अज्ञात प्रदेशांचा शोध घेणे असो किंवा शहरातील रस्त्यांवरून सहजतेने प्रवास करणे असो, हॅरियर.ईव्ही प्रत्येक प्रवासाला अतुलनीय लक्झरीमध्ये गुंफते. ५०४ एनएम टॉर्क आणि क्यूडब्ल्यूडी ड्युअल–मोटरसह, ही एसयूव्ही भारतातील सर्वोत्तम स्वदेशी एसयूव्ही बनली आहे. चार आकर्षक रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध असलेल्या हॅरियर.ईव्ही ची सुरुवातीची किंमत २१.४९ लाख आहे.

## सदाबहार जिंगलसोबत भारताच्या हृदयाची पुन्हा धडधड!

छत्रपती संभाजीनगर : मागील वर्षीच्या 'नमक हो टाटा का... टाटा नमक' या जाहिरातीला ग्राहकांकडून लाभलेला प्रचंड प्रतिसाद पाहता, भारतातील पहिल्या क्रमांकाचा आयोडीनयुक्त मिठाचा ब्रँड असलेल्या 'टाटा सॉल्ट'ने पुन्हा नव्या जोमात हजेरी लावली आहे. ही जाहिरात आता २.० रूपात सादर होत असून, घराघरांशी निर्माण झालेल्या भावनिक नात्याला पुढे नेण्याचा प्रयत्न या माध्यमातून 'टाटा सॉल्ट'ने केला आहे. जाहिरातींच्या या नव्या मालिकेत आठ हृदयस्पर्शी आणि मजेदार ब्रँड फिल्म्स आहेत. 'टाटा सॉल्ट'च्या गाजलेल्या जिंगलला त्या नव्या अर्थाने उजाळा देतात आणि एक महत्त्वाचा संदेश देतात, की योग्य प्रमाणातील आयोडीनयुक्त टाटा मीठ मुलांच्या मानसिक विकासाला हातभार लावते आणि भविष्यातील तेजस्वी पिढी घडवते. 'देश का नमक' हे आपले स्थान अधिक बळकट करत, ही जाहिरात मालिका 'टाटा सॉल्ट'बद्दलचा विश्वास, त्याची उपयुक्तता आणि ग्राहकांशी असलेल्या नात्याचा उत्सव संगीतात्मक व प्रभावी पद्धतीने साजरा करते.

# खुलताबाद शहरात पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिकची अंत्ययात्रा



खुलताबाद प्रतिनिधी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त २२ मे .ते ५ जून या कालावधीत प्लास्टिक प्रदूषणाचे महत्व या विषयावर मोहीम राबविणेबाबत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांनी निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन या मोहीम अंतर्गत दिनांक ५ जून २०२५ रोजी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नगरपरिषद खुलताबाद मार्फत मुख्याधिकारी श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली खुलताबाद शहरात प्लास्टिक अंत्ययात्रा रॅली काढण्यात आली तसेच प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करून शहरातील नागरिक,व्यापारी,भाजी विक्रेते,फळ विक्रते,हॉटेल चालक यांना एकल वापर प्लास्टिक वापरणे यावर बंदी असून १२० मायक्रोन पेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक पिशवी वापरण्यात येऊ नये नसता यापुढे नगर परिषद मार्फत कडक कारवाई करण्यात येणार आहे असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच प्लास्टिक वापरामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली तथापि खुलताबाद शहर हे प्लास्टिक मुक्त शहर करण्याचे दिशेने वाटचाल करत आहे असा संदेश नागरिकांना देण्यात आला.

सदर प्लास्टिक अंत्ययात्रा रॅलीची सुरुवात नगरपरिषद कार्यालयापासून गुलमंडी, ठाकरे चौक ,बजरंग चौक,लहानी आळी, राजवाडा बाजार गल्ली,फर्ष मोहल्ला, टकारवाडी,नगरपरिषद कार्यालय येथे प्लास्टिक अंत्ययात्रा रॅली समारोप करण्यात आला व हरित शपथ घेण्यात आली.यावेळी नगरपरिषद मुख्याधिकारी श्री.समीर शेख नोडल अधिकारी श्रीहरी चौडेकर स्वच्छता निरीक्षक अंकुश भराड पाटील गणेश रोटे लक्ष्मण तुपे सय्यद कली मुद्दिन मंगलबाई बावस्कर सुरेश वाघ शरद भालेराव शेख नसबुद्दीन, सतीश भालेराव संतोष आव्हाड भानुदास सोनवणे तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी व जायंट्स ग्रुप ऑफ खुलताबाद सतीश कोळी परसराम बारगळ दिनेश सावजी राजेंद्र चव्हाण शिवाजी घोडके श्रीहरी जाधव जफर पठाण व पेस सेंटर येथील विद्यार्थी उपस्थित होते.

## दृष्टी आरोग्यक्रांतीची पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे शनिवारी होणार प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर, दि.५ : हॅलो मेडिकल फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवणाऱ्या आणि देशाला एक नवी आरोग्यदृष्टी देणाऱ्या डॉ. शशिकांत अहंकारी यांच्या कार्यावर अतुल देऊळगांवकर यांनी लिहिलेल्या 'दृष्टी आरोग्यक्रांतीची' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन शनिवार, दिनांक ७ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता रुक्मिणी सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या प्रकाशन सोहळ्याच्या कार्यक्रमास कृषिभूषण विजयअण्णा बोराड, राज्याचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, महाराष्ट्र आरोग्यसेवा माजी संचालक डॉ. प्रदीप आवटे आणि हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अजित भागवत आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमात वैद्यकीय शिक्षण, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील बदल आणि लोकसहभागावर आधारित चर्चा होणार आहे. या प्रकाशन सोहळ्यास सर्वांना खुला प्रवेश असणार असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक डॉ. शुभांगी अहंकारी, डॉ.विजय गायकवाड, डॉ.आनंद निकाळजे आणि डॉ. स्वाती शिरडकर,डॉ. रेखा शेळके, डॉ.क्रांती रायमाने यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन हॅलो मेडिकल फाउंडेशन आणि अक्षरांगण ,महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कॉलेज ऑफ कॅम्युनिकेशन, कल्चर आणि मिडिया यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

डॉ.शशिकांत अहंकारी यांच्या हॅलो फौंडेशनचा थोडक्यात परिचय :

ग्रामीण भागातील एक विद्यार्थी, वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच ग्रामीण आरोग्याच्या स्तर उंचावण्यासाठी काय करता येईल, यावर सक्रिय होतो. त्या दृष्टीने विविध उपक्रम आखतो. त्यातूनच पुढे 'भारत वैद्य','हॅलो मेडिकल फाऊंडेशन', 'महिला बचतगट योजना', 'एकल महिलांचे सक्षमीकरण' असे उपक्रम साकारतात. त्या स्थानिक 'भारतवैद्य' उपक्रमातूनच पुढे राष्ट्रीय पातळीवर 'आशा' साकारते. 'व्यवस्थेसाठी माणूस' नाही, तर 'माणसासाठी व्यवस्था' हे ब्रीद कठोरपणे पाळत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. शशिकांत अहंकारी आजन्म प्रयत्नशील राहिले.ग्रामीण आरोग्यात सुधारणा घडवण्यासाठी नवी दृष्टी देणारा त्यांचा जीवनप्रवास हृद्य तर आहेच, पण अनुकरणीयही आहे.

## सोयगाव न.पं.च्या वतीने जागतिक पर्यावरण दिन दिनानिमित्त वृक्षारोपण संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ जून



सोयगाव नगरपंचायत कार्यालयाच्या परिसरात व संत जगनाडे महाराज सामाजिक सभागृह परिसरात ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम अभियान राबविण्यात आले.या कार्यक्रमास नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपाध्यक्षा सुरेखाताई काळे,प्र.मुख्याधिकारी संभाजी देशमुख,गटनेते अक्षय काळे,नगरसेवक गजानन कुडके,नगरसेवक हर्षल काळे,नगरसेविका संध्याबाई मापारी,नगरसेवक रऊफ देशमुख, इ.स्थापत्य अभियंता अभिजीत सहाने,लेखापाल व लेखापरीक्षा विशाल डोईफोडे,स्वप्निल सुकटे,लिपिक राजू जंजाळ,समाधान गायकवाड, सारंग बागले, शहर समन्वयक दिनेश हिवाळे,सुरज च व्हा ण , अ रु णा बा ई श्रीखंडे,सुमित मोरे, इतर सर्व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

## 'कायाप्पा चा पाडा' या नाटकाला 'सर्वोत्कृष्ट नाट्य प्रयोग प्रथम' पारितोषिक



बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्या कलावंत कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आंतरविभागीय खात्यांतर्गत नाट्य स्पर्धा भरवीत असते. यंदाचे या स्पर्धेचे ५३ वे वर्ष होते. यावर्षी बा. य. ल. नायर धर्मदाय रुग्णालय तर्फे सादर झालेल्या 'कायाप्पा चा पाडा' या नाटकाला 'सर्वोत्कृष्ट नाट्य प्रयोग प्रथम' पारितोषिक प्राप्त झाले. या व्यतिरिक्त या नाटकासाठी आठ वैयक्तिक पारितोषिकही प्राप्त झाले आहे. =ऋ सदर नाटक श्री देवेंद्र मधुकर काळसेकर (स्वतः नायर रुग्णालय कर्मचारी) यांनी लिहिले आहे व नाटकाचे दिग्दर्शन नम्रता देवेंद्र काळसेकर यांनी केलेले आहे. यासाठी दिग्दर्शनाचे सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक त्यांना प्राप्त झाले. ही दोघं ठरवळरींळेप जपलेश्रेसू विभागात ठरवळे ढहशीरळींीं ह्या हुद्यावर कार्यरत आहेत. सर्व तांत्रिकी प्रथम पारितोषिक प्राप्त करून नायर रुग्णालयाने या स्पर्धेत भरघोस यश मिळवले आहे. नायर नाटक मंडळ, यात अगदी कामगार पासून ते लश्रशीळलरश्र स्टाफ, सिस्टर्स, नर्सेस, लॅब टेक्निशन, डॉक्टर, असोसिएट प्रोफेसर ते अगदी विभाग प्रमुख असे सर्व कर्मचारी एकत्रितपणे येऊन काम करतात. नाटक ही त्यांची फक्त आवड नसून वेड आहे आणि त्यामुळे आपल्या अतिशय जोखमीच्या व व्यस्त अशा कामकाजातून ही तालमीसाठी आपले कार्यालयीन वेळ संपल्यानंतर ते सवड ही काढतात. गेली तीन–चार वर्ष नायर रुग्णालय तर्फे सादर झालेल्या नाटकांनी पहिल्या तीन क्रमांकात आपले स्थान मिळवले आहे व अनेक वैयक्तिक पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. राज्य नाट्य स्पर्धेत ही त्यांना अनेकदा यश मिळाले आहे. गेल्या वर्षी त्यांनी सादर केलेले नाटक 'धनंजय माने येथे राहतात का?' (लेखिका– रूपाली मिलिंद पवार नायर रुग्णालय कर्मचारी ) याला सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व प्रेक्षक प्रतिसादामुळे याचे स्पर्धेनंतर प्रायोगिक रंगभूमीवर पदार्पण झालेले आहे. नायर संघाने त्याचे आतापर्यंत मुंबई व मुंबई बाहेर असे ११ प्रयोग सादर केलेले आहे.

## जैन श्वेतांबर मुर्तीपुजक श्री संघाच्या अध्यक्षपदी अनिलकुमार संचेती तर सचिवपदी रूपराज सुराणा



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – जैन श्वेतांबर मुर्तीपुजक श्री.संघ,श्री विमलनाथ जैन मंदिर, जाधवमंडी, बांबुगल्ली मंदिराची नुकतीच बैठक संपन्न झाली.बैठकीला संघाचे सदस्यगण मोठ्या संख्येत उपस्थित होते.बैठकीची सुरुवात नमोकार महामंत्राने करण्यात आली. यावेळी मागील सहा वर्षांत झालेल्या कामाचा आढावा सचिव रूपराज सुराणा यांनी मांडला व मंदिराचा सन २४–२५ चा लेखा जोखा कोषाध्यक्ष राजेश संचेती यांनी सभेसमोर मांडला त्याला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

व त्यानंतर बैठकीचे संचालन संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयराज संघवी यांनी केले व प्रस्तावना करून नवीन कार्यकारी मंडल निवडण्यासाठी सर्व उपस्थित सदस्यगणाचे विचार घेतले व पुढील २०२५ ते २०२८ अशा तिन वर्षासाठी सर्वानुमते या बैठकीमध्ये जैन श्वेतांबर मुर्तीपुजक श्री.संघाच्या अध्यक्ष पदी अनिलकुमार संचेती तर सचिव पदी रूपराज सुराणा तर उपाध्यक्ष पदी पोपटलाल जैन तर कोषाध्यक्ष पदी राजेश संचेती, सहसचिव पदी निलेश जैन, विश्वस्थ पदी अभय बोरा, प्रकाश जैन, विजय कोठारी, दर्शन संचेती, अजय सिंघवी, मनोज जैन यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सल्लागार समिती पदी विजयराज संघवी, इंदरचंद संचेती, अशोक गेलडा, मदनलाल जैन, प्रकाशचंद चोरडिया, कांतीलाल मुथा, पारस मुथा आदींची निवड करण्यात आली. नुतन अध्यक्ष अनिलकुमार संचेती यांनी सांगीतले की, साधु संतांची सेवा, पर्युषण पर्व काळात विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यकम तसेच सामाजिक उपक्रम, वृक्षारोपन, शैक्षणिक साहित्य वाटप, आदी धार्मिक कार्यात सहभाग नोदवु असेही सांगीतले.व मंदिराचे जे काम बाकी तेही लवकरच करणाचा मानस सांगितला. नुतन कार्यकारणीला छत्रपती संभाजीनगर येथील सकल जैन समाजाच्या बांधवांनी शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथील विद्यार्थ्यांसह,मान्यवरांच्या हस्ते पर्यावरण दिन साजरा



सोयगाव ,दि.५ जून : जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुटी सुरु असतांनाही दि.५ जून पर्यावर दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.विद्यार्थ्यांनी अगोदर शालेय परीसर,काळे नगर,तहसिल कार्यालय,पंचायत समिती येथे वृक्ष दिंडी काढून पर्यावरण विषयक घोषणा देऊन परीसर दणानूण सोडला.यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी तात्याराव माळी,कनिष्ठ प्रशासन अधिकारी महेंद्रसिग पाटील,नायब तहसीलदार संभाजी देशमुख,वनपाल व्ही. एच.घुले,फर्दापूर केंद्राचे केंद्र प्रमुख मोतीराम जोहरे,कृषी विस्तार अधिकारी रामेश्वर घोगडे,नगरसेवक संतोष बोडखे,रामजीनगर शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,कनिष्ठ लिपीक अमोल गायकवाड,वनरक्षक आर.एस.साळवे,एस.बी.धनवई उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी शालेय परीसरात तर विद्यार्थ्यांनी घराचा परिसरात व शेता मध्ये वृक्षा रोपण करून रोपे वाढीस लावण्याची शपथ घेतली.यावेळी पंचायत समिती,सोयगाव कडून विद्यार्थ्यांना बिस्कीट वाटप करण्यात आले.

## आपेगांव येथे भाजपच्या वतीने वृक्षारोपण



पैठण दि ०६ : जागतीक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी विहामांडवा मंडळाच्या वतीने आपेगांव येथे अनंत औटे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी तालुका अध्यक्ष लक्ष्मण औटे, विहामांडवा मंडळ अध्यक्ष दत्ता वाकडे, आशीष मापारी, विलास संत, दत्ता नरके, माऊली औटे, भाऊसाहेब गायकवाड, दिपक औटे, रवी औटे, सद्दाम शेख, आदींसह गावकरी उपस्थित होते.

## फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये शांतता समितीची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ५ फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये बकरी ईद निमित्त शांतता समितीची बैठक घेण्यात आली. फर्दापूर परिसरातील सर्व मुस्लिम बांधव यांना पोलिस स्टेशन मध्ये बोलण्यात आले त्यानंतर यांना ईद साठी सर्व नियम गोवंश हत्या याविषयी माहिती देण्यात आली यावेळी फर्दापूर मस्जिद चे अलिम कादरी यांनी सर्व मुस्लिम बांधव यांना ईद कशी साजरी करण्यात यावी तसेच शासनाच्या नियमानुसार गोवंश विषयी माहिती देण्यात आली तसेच फर्दापूर परिसरातील सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते तसेच फर्दापूर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे, सहा सुग्रीव चाटे पोलिस कर्मचारी तसेच पत्रकार शिवाजी महाकाळ, अशोक हातोळे उपस्थित होते

## श्रीराम मंदिरासाठी जोशी परिवाराकडून जागेचे दानपत्र



पैठण दि ०६ : शहरातील दुर्गावाडी बालाजी मंदिर शेजारील मंदिराच्या बाजूला असलेली जागा माजी नगराध्यक्ष स्वर्गीय सोमनाथराव जोशी यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे तिन्ही मुले भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष महेशदादा जोशी, राजेश जोशी व योगेश जोशी यांनी प्रभू श्रीराम मंदिरासाठी देऊन आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण केले.

शहराच्या मध्यभागी असलेल्या ९४.१ स्क्वेअर मीटर जागा ही राम मंदिरासाठी स्व. सोमनाथराव जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्याबद्दल संपूर्ण पैठण शहरात दानशूर जोशी परिवाराचे अभिनंदन होत आहे.जोशी परिवाराने बालाजी मंदिर येथे जागेचे दानपत्र केलेले सदरील दस्तावेज पुरोहित शुक्ल, गर्गे, वाघेश्वरी, चक्रे यांच्या मंत्रघोषात विधिवत पूजन करून राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष जयनारायण लोहिया व सचिव मधुसूदन मुंदडा यांच्या सुपुत केले यावेळी नंदलाल लाहोटी, भूषण भंडारी, सुनील बलदवा, ड. उगले, उमेश बाहेती, नंदकिशोर मालानी, रमेश पाठक, गणेश लोहिया पंचक्रोशीतील नागरिक भाविक भक्त उपस्थित होते.

## सोयगाव गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे याचा सत्कार



सोयगाव,दि.५ जून : सोयगाव नवनियुक्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे याचा सत्कार करताना सोयगाव तालुक्यातील शिक्षकाकडून करण्यात आला.यावेळी सत्कार करताना किरणकुमार पाटील.यावेळी उपस्थित पैठण येथे बदली झालेले गटशिक्षणाधिकारी रंगनाथ अढाव,केंद्र प्रमुख सचिन पाटील,केंद्रप्रमुख मोती जोहरे,फिरोज तडवी,दादाभाऊ संसारे,विकास पवार,उमेश महालपुरे,नितीन राजपुत,जनार्धन साबळे,राजू सोनवणे,माऊली पाटील,मधुकर पाटील व तालुक्यातील इतर शिक्षक व कार्यालयिन स्टॉप उपस्थित होते.

## 'अर्थ व्हेंचर फंड ख' मध्ये गुंतवणुकीची प्रक्रिया पूर्ण

छत्रपती संभाजीनगर : 'अर्थ व्हेंचर फंड ख' (एव्हीएफ ख) हा 'अर्थ इंडिया व्हेंचर्स'ने प्रायोजित केलेला भारतातील प्रारंभिक टप्प्यातील मायक्रो व्हेंचर कॅपिटल फंड सध्या आपल्या अंतिम गुंतवणुकीच्या टप्प्यात आहे. या फंडाने आतापर्यंत ३२ बीजस्तरीय स्टार्टअप्समध्ये १७५ कोटींहून अधिक रक्कम गुंतवली आहे. 'एव्हीएफ ।'ने सुरुवातीपासूनच ६१ टक्के आंतरिक परतावा दर (आयआरआर) मिळवून या उद्योगातील ३५ टक्क्यांच्या सरासरीपेक्षा खूपच चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे 'एव्हीएफ ख'ला जागतिक स्तरावरील सर्वोत्तम ५ फंडांमध्ये स्थान मिळाले आहे. केवळ आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्येच 'एव्हीएफ ख'च्या पोर्टफोलिओमधील कंपन्यांनी एकत्रितपणे २,१०० कोटींपेक्षा अधिक उत्पन्न निर्माण केले.

## अग्रलेख...

# तुर्कस्तान, अझरबैजानला शह

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावप्रसंगी पाकिस्तानला सक्रिय पाठिंबा देणे अझरबैजान आणि तुर्कस्तानच्या अंगलट आले आहे. देशातील ५० टक्के पर्यटकांनी या देशातील बुकिंग रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, या दोन्ही देशांमधील वस्तूंवर बहिष्कार घालण्याच्या आवाहनाला मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असल्याचे दिसत आहे. भारताने आजवर कुणा देशावर हल्ला करून, त्याची भूमी बळकावल्याचे उदाहरण नाही. कुठल्या युद्धात भारताने संपूर्ण भूमिका समजल्याशिवाय कुणाला पाठिंबा दिलेला नाही. रशिया-युक्रेन युद्धातही भारताने उभयतांना युद्धापासून दूर राहण्याचे आवाहन करून तटस्थतेची भूमिका निभावली होती. पहलगामच्या बैसरण घाटीत पाकिस्तानी जिहादी दहशतवाद्यांनी २६ हिंदू पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत सरकारने पुकारलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचे कंबरडे मोडले. भारताने एकीकडे लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबूल मुजाहिद्दीनला पाणी पाजले आणि दुसरीकडे जनजागृती करून अनेक देशांना पाकिस्तानने केलेल्या आगळिकीची माहितीही दिली. या साऱ्या लढाईत दहशतवादाला बळी पडलेले बहुतांशी देश भारताच्या पाठीशी उभे राहिले असताना अझरबैजान आणि तुर्कस्तानने मात्र पाकिस्तानच्या पाठीशी उभे राहून भारताशी शत्रुत्व विकत घेतले आहे. पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने भारतीय पर्यटकांमध्ये या देशांविरुद्ध तीव्र भावना निर्माण झाल्या. यामुळे अझरबैजान आणि तुर्कस्तानला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. अनेक ट्रॅव्हल एजन्सीजने या देशांमधील बुकिंग रद्द केल्या. यामुळे त्यांच्या पर्यटन उद्योगाला आर्थिक फटका बसला आहे. भारतीय व्यापारी संघटनांनी तुर्कस्तान आणि अझरबैजानमधून आयात कमी करण्याचे आवाहन केले आहे. काही तुर्की कंपन्यांचे भारतातले करार रद्द करण्यात आले आहेत, त्यात विमानतळावर विमान वाहतूक सेवा देणाऱ्या सेलेबी कंपनीचा समावेश आहे. भारताच्या नाराजीमुळे या देशांसोबतचे संबंध ताणले गेले आहेत. भारत एक मोठी अर्थव्यवस्था आणि जागतिक शक्ती असल्याने, त्यांचे समर्थन गमावणे या देशांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर धोक्याचे ठरणार, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारताने यापूर्वी दाखवून दिले आहे की, तो आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही देशावर अवलंबून राहणार नाही आणि जे देश भारताच्या विरोधात भूमिका घेतील, त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. पाकिस्तानची मदत करण्यामागे या दोन्ही देशांचा मुस्लिम धर्मदेखील महत्त्वाचा ठरला आहे.या दोन्ही देशांचा भारतासोबतचा व्यापार १२ अब्ज डॉलर्सचा आहे. अलिकडे या देशांमध्ये जाणाऱ्या भारतीयांची संख्या वाढली आहे. पण पाकिस्तानच्या गोटात जाऊन बसल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसणे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. भारत तुर्कस्तानला कार, रसायने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात करतो. भारतात या देशातून इंधन, मशिनरी, सिमेंट आणि ड्रायफ्रूट्स आयात होतात. तुर्कस्तानच्या अनेक कंपन्या भारतात लोकप्रिय आहेत. यामध्ये गोदिवा, उल्कर, आणि एलसी वायकिकी यांचा समावेश आहे. तेथील स्किन केअर आणि पर्सनल केअर ब्रॅण्डही भारतात शिरकाव करीत आहेत. पण नव्या बदललेल्या समीकरणामुळे या साऱ्या व्यापारावर तणावाची आणि बॉयकॉटच्या मागणीची काळी छाया पडली आहे. अझरबैजानही पर्यटनाच्या दृष्टीने भारतासाठी महत्त्वाचा देश होता. या देशासाठी नवी दिल्लीहून दर आठवड्याला १० थेट उड्डाणे आहेत. रशिया, तुर्कस्तान, इराणनंतर सर्वाधिक भारतीय पर्यटक अझरबैजानला जातात. बदललेल्या समीकरणात या देशासोबतचा व्यापारही धोक्यात येणार आहे. या दोघांना शह देण्यासाठी भारताने आर्मेनियाला साद घातली असून, भारत-आर्मेनिया युती पाकिस्तानी मित्रांसाठी ध्योक्याची ठरणार आहे.

अझरबैजानचे माजी अध्यक्ष हैदर अलीयेव यांनी म्हटले होते की, तुर्कस्तान आणि अझरबैजान यांच्यात ''एक राष्ट्र, दोन राज्ये'' इतके घनिष्ठ बंधुत्व आहे. बदलत्या भूराजकीय गणितांमुळे हे नाते आता अधिक जटिल परंतु घट्ट अशा युतीमध्ये विकसित झाले आहे. २०२० साली झालेल्या काराबाख युद्धामुळे या दोन देशांनी आर्मेनियाशी शत्रुत्व या समान धाग्याचा वापर करून परस्पर मैत्रीसंबंध अधिकच गहिरे केले आहेत. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर नागोर्नो-काराबाख संघर्षात रशियाने आर्मेनियाची बाजू घेतली होती. परंतु चार वर्षांपूर्वी झालेल्या मोठ्या संघर्षात रशियाने अझरबैजानचे तेल, गॅस आणि दळणवळणासाठी असणारे महत्त्व ओळखून आर्मेनियाला अपेक्षित पाठिंबा दिला नाही. दुसरीकडे पाकिस्ताननेही अझरबैजानच्या बाजूने मैदानात उतरून या देशाची कोंडी केली. परिणामी दुर्बळ ठरलेल्या आर्मेनियाला नागोर्नो-काराबाखचा मोठा भूभाग अझरबैजानला सोपवावा लागला. तुर्कस्ताननेही संलग्न सीमा बंद करून आर्मेनियाच्या संकटात भर टाकली. आर्मेनियातील कॉकेशिअस भागातील ख्रिश्चनांना कित्येक दशके इस्लामी जिहादी कारवायांचा फटका बसत आला आहे. १९१५-१६ मध्ये जिहादी मुस्लिमांनी जवळपास १२ लाख आर्मेनियन ख्रिश्चनांचे शिरकाण केले होते. सध्या तुर्कस्तानच्या प्रभावक्षेत्रात असलेल्या भूभागात तेव्हा आर्मेनियन ख्रिश्चनांची जनसंख्या २० टक्के होती. मुस्लिमांकडून झालेल्या हत्या व असुरक्षिततेमुळे ख्रिश्चनांनी पलायन केल्यामुळे आज तेथे केवळ २ टक्के ख्रिश्चन उरले आहेत. या पृष्ठभूमीवर भारताकडून आर्मेनियात होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झालेली आहे. आर्मेनियाला पूर्वी शून्य निर्यात करणारा भारत आज त्यांचा प्रमुख शस्त्रास्त्र पुरवठादार बनला आहे. भारत आणि आर्मेनिया यांच्यातील या सौहार्दाच्या संबंधांमुळे आशिया खंडाच्या उत्तरेला युरोपचे द्वार असणाऱ्या या कॉकेशिअस पर्वतरांगांच्या नजीकच्या या भूभागात भारताला धोरणात्मक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून, भारताचे प्रभावक्षेत्र वाढले आहे.

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटनुसार २०१६ ते २०१८ दरम्यान आर्मेनियाच्या शस्त्रास्त्र आयातीत भारताचे योगदान जवळजवळ शून्य होते. गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आर्मेनियाने २०२२ ते २०२४ दरम्यान केलेल्या एकूण शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा आयातीपैकी ४३ टक्के भारतातून केली आहे. भारताने आर्मेनियासोबत शेकडो दशलक्ष डॉलर्सचे करार केले आहेत. आर्मेनिया हा देश आकाश-१एस एअर डिफेन्स मिसाईल सिस्टिम या स्वदेशी विकसित भारतीय हवाई संरक्षण प्लॅटफॉर्मचा पहिला परदेशी ग्राहक आहे. भारताने आर्मेनियाला पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट लाँचर्स हे अत्यंत सक्षम रॉकेट लाँचर्स पुरवण्यास सुरुवात केली आहे. आर्मेनियाच्या तोफखान्याला प्रगत बनवण्यासाठी भारताने प्रगत आर्टिलरी गन सिस्टिम पुरवल्या आहेत. या देशाने मार्च २०२० मध्ये ४० दशलक्ष डॉलरमध्ये भारताकडून ४ स्वाती वेपन लोकेटिंग रडार खरेदी केले. या देशाने रणगाडाविरोधी रॉकेट आणि विविध दारुगोळा पुरवठ्याबाबत भारताशी करार केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून अझरबैजान आणि तुर्कस्तान या दोन मुस्लिम देशांच्या कात्रीत सापडलेल्या आर्मेनियाशी धोरणात्मक संबंध प्रस्थापित करून, भारत त्याला विविध शस्त्रास्त्रे पुरवत आहे. आर्मेनियाचे त्याच्या शेजारी राष्ट्रांशी पूर्वापार चालत आलेले वैर आहे. इंग्रजांनी द्विराष्ट्रवादाला खतपाणी घालून भारताची फाळणी केली आणि तेव्हापासूनच भारताला पाकिस्तानातील कट्टरपंथीयांच्या प्रभावामुळे इस्लामी दहशतवादाचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अगदी तसाच अनुभव आर्मेनियन लोकांना तुर्कस्तान आणि अझरबैजानमधील कट्टरतावादी मुस्लिमांकडून सातत्याने आलेला आहे. फाळणी झाली तेव्हा पाकिस्तानात मुस्लिमांनी हिंसाचार सुरू केल्यामुळे लक्षावधी हिंदूंना पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात यावे लागले होते. आर्मेनियाच्या अनेक नागरिकांना देखील तुर्कस्तान आणि अझरबैजानने पोसलेल्या जिहादच्या भीतीने पलायन करावे लागलेले आहे. बदलत्या स्थितीत आर्मेनियाशी व्यापार बळकट करून, भारताने तुर्कस्तान आणि अझरबैजानला शह दिला आहे.


## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# डिजिटल प्रतिकृती; उद्याचे आभासी वास्तव!

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तींबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे व काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता क्षणभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर काय होईल? ही वास्तवाशी समांतर असणारी प्रतिमा असेल आणि आपली नक्कलही असेल. आज असे काही घडत असून तंत्रज्ञानाचा नवसाक्षात्कार घडवत आहे. या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन म्हणजे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे एक अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या साहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते. नित्यनेमाने नवोन्मेषाला सामोरे जाणाऱ्या आजच्या काळात तंत्रज्ञानाचे असे आविष्कार सातत्याने पाहायला मिळत असतात. त्यातील काही कल्पनेच्या पलीकडचे असतात, पण आपले जीवन मोठ्या प्रमाणात सुसह्य करतात. उद्याचे आभासी वास्तव ठरू शकणाऱ्या या डिजिटल प्रतिकृतीचे अंतरंग आवर्जून समजून घेण्यासारखे आहेत.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रीकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान हे एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे. व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. 'डिजिटल ट्विन' हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा २००२ मध्ये मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध



उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केले जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधली देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धी आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टिमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाईम डेटा आणि सिम्युलेशन एकत्रित करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांचे भौतिक समकक्ष जवळून प्रतिबिंबित करता येतात.

डिजिटल जुळे डेटा स्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्येही अफाट क्षमता असते, पण त्यात कालानुरूप त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा मदत करू शकतो. एआयमधील प्रिडिक्टिव्ह अनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुमची रिअलटाईम मदत करू शकतात.

प्लॉड या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे. तो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमची प्राधान्ये, तुमचे संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे, डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करून माहिती निर्माण करते. इथे तसे होत नाही. फक्त आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण आपला डिजिटल ट्विन करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहींना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो आणि इच्छित स्थळाचा वेध घेतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने शोधलेला पत्ता कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य सुसह्य नक्की होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दलची सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हेच अंतिम सत्य.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# पुन्हा कोरोना; सावध होण्याची वेळ

कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला हादरवून सोडले होते. भारतातही याचा प्रचंड फटका बसला. लाखो जणांना आपले प्राण गमवावे लागले, कोट्यवधी लोकांचे आयुष्य बदलून गेले. दोन वर्षांच्या कठीण काळानंतर कोरोना नियंत्रणात आला, लसीकरणाने जनतेत आश्वस्तता आली आणि समाज पुन्हा एकदा सामान्य जीवनाकडे वळला. मात्र, नुकतेच समोर आलेले आकडे पाहता पुन्हा एकदा कोरोनाचा धोका डोके वर काढत आहे. देशात सध्या चार हजार नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. विशेषतः महाराष्ट्रात पुन्हा नव्याने ८६ रुग्ण आढळले असून, चंद्रपूर, नागपूर आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये केवळ दोन दिवसांत चार मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही स्थिती गंभीर असून, जनतेने आणि शासनाने दोघांनीही योग्य खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. लसीकरणानंतर कोरोना संपला आहे, अशी एक सामूहिक भावना समाजात निर्माण झाली होती. त्यामुळे अनेकांनी मुखाच्छादन वापरणे, सार्वजनिक ठिकाणी भौतिक अंतर राखणे, सॅनिटायझर वापरणे यासारख्या गोष्टी पूर्णपणे थांबवल्या.



पण आता, जेव्हा पुन्हा रुग्णसंख्या वाढू लागली आहे, तेव्हा या गाफीलपणाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. लस ही संसर्ग पूर्णपणे रोखत नाही, तर ती फक्त गंभीर लक्षणे, हॉस्पिटलायझेशन आणि मृत्यूचे प्रमाण कमी करते. नव्याने आढळणारे कोरोना व्हेरिएंट्स, विशेषतः ओमिक्रॉन आणि त्याचे उपप्रकार, हे अधिक संसर्गजन्य असून लसीकरणानंतरही लोकांना बाधित करत आहेत. त्यामुळे वाढती रुग्णसंख्या ही फक्त आरोग्य व्यवस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब आहे.

पुढील मोठा प्रश्न हा आहे की शासनाने नव्याने उद्भवणाऱ्या परिस्थितीकडे किती गांभीर्याने पाहिले आहे? २०२० आणि २०२१ मध्ये जो त्रास सहन करावा लागला- ऑक्सिजनचा तुटवडा, बेड्सची अनुपलब्धता, औषधांची टंचाई- ही परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी सरकारने आणि आरोग्य यंत्रणांनी योग्य त्या उपाययोजना आखणे गरजेचे आहे. शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना जर लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत मर्यादित राहिल्या, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचबरोबर सार्वजनिक कार्यक्रम, सण-समारंभ, राजकीय सभा यामध्ये खबरदारी घेतली जात आहे का, याचीही खातरजमा केली पाहिजे. सध्याच्या वातावरणात कुठलाही हलगर्जीपणा प्रचंड महागात पडू शकतो. कोरोनाचा संसर्ग पुन्हा पसरू नये यासाठी काही ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. सर्वप्रथम, मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहिमा पुन्हा सुरू कराव्या लागतील. नागरिकांनी मुखाच्छादन वापरणे, गर्दी टाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे याचे महत्त्व पुन्हा लक्षात आणून द्यावे लागेल. शाळा आणि महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांमध्ये योग्य माहिती पसरवणे अत्यावश्यक आहे. तसेच, समाज माध्यमावर अफवा आणि चुकीच्या माहितीचा प्रसार होऊ नये यासाठी सायबर यंत्रणांनी अधिक जागरूक राहिले पाहिजे. साथीच्या रोगांमध्ये सुरुवातीचे काही दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामुळेच कोविड चाचण्या मोठ्या प्रमाणावर वाढविणे, संसर्ग असलेल्या भागात हॉटस्पॉट तयार करून निर्बंध लावणे, नागरिकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे हे तातडीचे उपाय असू शकतात. याशिवाय, सरकारी रुग्णालयांमध्ये कोविडसाठी आवश्यक औषधे, व्हेंटिलेटर्स, पीपीई किट्स, ऑक्सिजनची साठवणूक याची पुन्हा एकदा तपासणी करून सर्व व्यवस्था सज्ज ठेवावी लागेल. अशा उपाययोजनांनी मोठ्या संकटाला टाळता येऊ शकते. ज्या जिल्ह्यांमध्ये आधीच मृत्यू झाले आहेत, तिथे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. चंद्रपूर, नागपूर आणि इतर भागांमध्ये घडलेले मृत्यू हे केवळ आकडेवारी नसून तो एक इशारा आहे. हे मृत्यू लसीकरण असूनही झाले का, संबंधित व्यक्तींना इतर आजार होते का, त्यांच्यावर वेळीच उपचार झाले का - या सर्व बाबींची चिकित्सा व्हायला हवी. सरकारने अशा भागांमध्ये विशेष आरोग्य पथक नेमून स्थानिक स्तरावर उपाययोजना सुरू करायला हव्यात. कोरोनाचा अनुभव आपल्याला शिकवून गेला होता की, आरोग्य व्यवस्था किती महत्त्वाची आहे. त्यामुळे आता पुन्हा ही चूक टाळण्याची गरज आहे. ही वेळ काळजी घेण्याची आहे. जागरूक होण्याची आहे. कारण पुन्हा कोरोना आला आहे आणि तो कोणाला क्षमा करणार नाही, हे तितकेच सत्य आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# तेजप्रताप, राजद आणि बिहारची निवडणूक

बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांनी आपला मोठा मुलगा तेजप्रताप यादव याची पक्षातून आणि कुटुंबातून हकालपट्टी केली. राजकीय पक्षात पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे एखाद्या नेत्याची पक्षातून हकालपट्टी करण्याच्या घटना नवीन नाही. पण पक्षासोबत एखाद्या नेत्याची कुटुंबातूनही हकालपट्टी होण्याची घटना दुर्मिळ म्हणावी लागेल. याला कारण ठरले २४ मेची फेसबुकवरील एक पोस्ट. यात आपण १२ वर्षांपासून अनुष्का यादव यांच्यासोबत लिव्ह इन मध्ये असल्याचे तेजप्रताप यादव यांनी म्हटले होते. एकप्रकारे त्यांनी आपल्या प्रेमाची जाहीर कबुली दिली. यामुळे बिहारच्या राजकारणात विशेषतः राजदमध्ये भूकंप आला.

भाजपा आणि जदयूच्या प्रवक्त्यांनी राजदवर हल्ला चढवला. त्यामुळे तेजप्रताप यांनी ही पोस्ट काढून टाकली. नंतर पुन्हा टाकली आणि दुसऱ्यांदा पुन्हा काढून टाकली. यामुळे राजद तसेच लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबाचे व्हायचे ते राजकीय नुकसान होऊन गेले. पक्षाची तसेच कुटुंबाची प्रतिमा डागाळल्याच्या कारणावरून लालूप्रसाद यांनी तेजप्रताप यांची पक्षातून सहा वर्षांसाठी तसेच कुटुंबातून अनिश्चित काळासाठी हकालपट्टी केली. खरं म्हणजे सामान्यस्थितीत ही असामान्य घटना नव्हती. पण बिहार विधानसभेची निवडणूक यावर्षीच्या अखेरीस होऊ घातली आहे. त्यामुळे तेजप्रतापची छछोर वागणूक आपल्याला अडचणीत आणेल, असे वाटल्यामुळे लालूप्रसाद यादव यांना या घटनेची गंभीर दखल घ्यावी लागली.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेजप्रताप आणि ऐश्वर्या राय यांच्या घटस्फोटाचे प्रकरण न्यायालयात आहे. तसेच येत्या महिन्या दोन महिन्यात त्याचा निकाल लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील निकाल तेजप्रताप यांच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. ऐश्वर्या राय या बिहारचे माजी मुख्यमंत्री दरोगाप्रसाद राय यांची नात आहे. ऐश्वर्याचे वडील चंद्रिकाप्रसाद हे राजदचे नेते होते. तेजप्रताप १२ वर्षांपासून अनुष्का यादव हिच्यासोबत लिव्ह इनमध्ये असताना लालूप्रसादांनी त्याचे ऐश्वर्या रायशी लग्नच का केले, असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणजे लालूप्रसादांनी ऐश्वर्या राय आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाची फसवणूक केली, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतील संभाव्य राजकीय नुकसान टाळण्यासाठी लालूप्रसादांना तेजप्रतापची कुटुंबातूनही हकालपट्टी करावी लागली. अन्यथा लालूप्रसाद



यादव आणि नैतिकता आणि नीतिमत्ता यांचा दूरदूरपर्यंत संबंध नाही. लालूप्रसाद यादव यांचा आतापर्यंतचा राजकीय इतिहास पाहिला तरी यापेक्षा जास्त गंभीर अशी अनेक प्रकरणे त्यांच्या कार्यकाळात राजदमध्ये घडली आहेत. लालूप्रसाद यांचा साळा साधू यादव याच्या गुंडगिरीच्या घटना तर बिहारमधील जनतेच्या अंगावर काटा आणणाऱ्या होत्या. पण तेव्हा कधी लालूप्रसादांना नैतिकता आठवली नाही. त्यांनी साधू यादववर कोणतीही कारवाई केल्याचे स्मरत नाही. त्यामुळे तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म असे लालूप्रसादांना विचारावेसे वाटते. याचा अर्थ तेजप्रताप यादव यांच्यावरील त्यांची कारवाई चुकीची आहे, असे नाही.

काही वर्षांपूर्वी राजदमध्ये सक्रिय असताना तेजप्रताप यादवने आकाश यादव याची राजदच्या युवा आघाडीचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी राजदचे प्रदेश अध्यक्ष जगदानंदसिंह यांनी आकाश यादवची त्याच्या पदावरून हकालपट्टी केली होती. त्यामुळे चिडलेल्या तेजप्रतापने जगदानंदसिंह यांचा जाहीरपणे अपमान केला होता. आकाश यादव हा त्याच अनुष्का यादवचा भाऊ असल्याचे आता उघडकीस आले आहे. गंमत म्हणजे जगदानंदसिंह यांचा मुलगा खासदार सुधाकरने तेजप्रताप यादवची पाठराखण केली आहे. लालूप्रसाद यादव यांनी कारवाई केली असली तरी तेजप्रतापने त्यांच्याविरोधात कोणतेही विधान केले नाही वा नाराजीही व्यक्त केली नाही. ट्विटमधून त्याने वडील लालूप्रसाद यादव आणि आई राबडीदेवी यांच्याबद्दल आदरच व्यक्त केला आहे. एवढेच नाही तर आपण भाऊ तेजस्वी यादवच्या पाठीशी असल्याचे म्हटले आहे.

असे करताना त्याने आपल्यावरील कारवाईचे खापर पक्षातील जयचंदांवर फोडले आहे. तेजस्वी यादवांचे राजकीय सल्लागार संजय यादव यांच्यावर तेजप्रतापचा खरा राग आहे. संजय यादवमुळे पक्षात आपल्याला डावलले जात असल्याचा त्याचा आरोप आहे. त्यामुळे संजय यादव यांचा उल्लेख तेजप्रतापने जयचंद असा केल्याचे मानले जात आहे. शिवसेना उबाठात जे स्थान मिलिंद नार्वेकर यांचे आहे, ते स्थान राजदमध्ये संजय यादवचे असल्याचे समजते. ज्याप्रमाणे शिवसेनेत मिलिंद नार्वेकर यांच्या अनुमतीशिवाय कोणी उद्धव ठाकरे यांना भेटू शकत नाही, त्याप्रमाणे राजदमध्ये संजय यादव यांच्या अनुमतीशिवाय कोणालाच लालूप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांना भेटता येत नाही, असे म्हटले जाते.

तेजप्रताप यादव हा कधी स्वतःला भगवान कृष्णाचा अवतार मानतो, कधी शंकराचा. राजदमध्ये असतानाही त्याच्या वागणुकीने पक्षाचे सर्व नेते त्रस्त झाले होते. त्यामुळे त्याच्या हकालपट्टीने सुंठेवाचून खोकला गेल्याची भावना पक्षात व्यक्त केली जात आहे. पण तेजप्रताप फार दिवस पक्षाबाहेर राहील असे वाटत नाही. त्याचे फार दिवस बाहेर राहणे राजदला परवडणारे नाही. याचा अर्थ पक्षात त्यांचा खूप फायदा आहे, असे नाही. राजदमध्ये फूट पाडण्यासाठी जदयू वा एखादा राजकीय पक्ष तेजप्रतापला आपल्याकडे ओढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेजस्वी यादव यांचे पक्षातील राजकीय वर्चस्व वाढल्यानंतर तेजप्रतापने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजदला आव्हान देण्यासाठी लालू-राबडी मोर्चा काढला होता. त्याला राजदविरुद्ध उमेदवार उतरवायचे होते, पण ते शक्य झाले नाही. फक्त जहानाबाद लोकसभा मतदारसंघात त्याने चंद्रप्रकाश हा आपला उमेदवार दिला. त्याला ७७५५ मते मिळाली. या मतदारसंघात राजदचे सुरेंद्र यादव यांचा १७५१ मतांनी पराभव झाला होता.

म्हणजे तेजप्रताप आपले उमेदवार जिंकवू शकला नाही तरी राजदचे उमेदवार हरवू नक्की शकतो. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या आधी लालूप्रसाद तेजप्रतापला पक्षात परत घेतील, हे नक्की. बाहेर निर्वासितासारखे राहण्यापेक्षा राजदमध्ये राहण्यात तेजप्रताप याचाही फायदा आहे. लालूप्रसाद यांचा ओढा तेजस्वी यादवकडे असला तरी तेजप्रताप आई राबडीदेवीचे लाडके आहेत. त्यामुळे राबडीदेवीच्या मध्यस्थीने येत्या काही दिवसांत तेजप्रतापची घरवापसी झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र काही दिवस तरी तेजप्रताप बिहारच्या राजकारणात खळबळ उडवेल, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### मनपा व महा मेट्रोची उत्कृष्ट संकल्पना

नागपूर विमानतळाकडून अजनी चौकाकडे येताना वर्धारोड महामार्ग व मेट्रोरेलचा तीन मजली अत्याधुनिक उड्डाणपूल आहे. त्यातील मधील मार्गावर अगदी वर चढतानापासूनच भारतरत्न पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तींचे मोठाले फोटो नावांसह सुंदररीत्या विशिष्ट अंतरावर लावण्यात आले आहेत. यामधील उड्डाणपुलाचे अंतर पार करताना एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती होते व या महानुभावांचे सहजच स्मरण होते. ही सुंदर संकल्पना प्रत्यक्षात उतरविणारे कौतुकास पात्र आहेत. माझे मित्र आनंद सहस्रबुद्धे यांनी या संदर्भात मांडलेली एक संकल्पना मांडू इच्छितो. आनंद यांचा असा प्रस्ताव आहे की नागपुरातीलच एक असा उड्डाणपूल जो सदर ते कामठीपर्यंत विस्तारित आहे (ऑटोमोटिव्हच्या पण पुढे जाणार) हा मेट्रो-महामार्गवर देखील अशाच प्रकारे आपले तीनही सैना दलांचे शूरवीर, सर्वोच्च परमवीरचक्र विजेते जवान/अधिकारी यांचे पण फोटो लावून त्यांना पण सन्मानित करण्यात यावे. नागपूरमधील अशा वेगळेपणाला नागरिकांचा व नागपुरात चहूबाजूंनी प्रवेश करणारे प्रवासी यांना नक्कीच अभिमान वाटेल ही खात्री आहे. नागपूर नगरीत प्रवेश करताच अशा प्रेरणादायी व्यक्तींचे दर्शन घडल्यास नक्कीच नागपूरच्या वैभवात भर पडेल यात शंका नाही. तेव्हा या सूचनेचा विचार व्हावा, ही विनंती.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### काँग्रेसकडून मोदीद्वेषाचा अतिरेक सुरूच

'शशी थरुर बनले भाजपाचे प्रवक्ते' ही बातमी वाचली. म्हणजे आजवर शशी थरुर यांनी जे केले ते काँग्रेसला योग्य वाटत होते पण आता कुठे त्यांनी मोदींचे थोडेसे कौतुक केले तर काँग्रेसला ती चमचेगिरी वाटावी? या सगळ्या प्रकारांचा नीट आणि खोलवर विचार केला तर त्याच्या मुळाशी, देशहिताला दुय्यम मानून व्यक्तिपूजेचा अतिरेक हे एकमेव कारण असल्याचे दिसून येते. काँग्रेस, भाजपा, समाजवादी पक्ष, द्रमुक, अण्णा द्रमुक, तृणमूल काँग्रेस, शिवसेना (दोन्ही गट), राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), नॅशनल कॉन्फरन्स, मनसे, राष्ट्रीय जनता दल अशा विविध राजकीय पक्षांची विचारसरणी बघितली की आपला नेता म्हणेल ती पूर्वदिशा अशी विचारधारा फोफावत आहे, मग तो नेता काहीही म्हणो! पूर्वी म्हणजे १९७५ च्या आणिबाणी लागण्याआधी, काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष असलेल्या देवकांत बारूआ यांनी इंदिरा इज इंडिया आणि इंडिया इज इंदिरा असे वादग्रस्त वक्तव्य करून व्यक्तिपूजेच्या जाहीर अतिरेकाचा श्रीगणेशा केला होता. अर्थात तत्पूर्वी आणि त्यानंतरही अनेकांच्या बाबतीत हा अतिरेक झाला आहे. आताही मोदींना विरोध म्हणजे भारताला विरोध, असे नवीन समीकरण जन्माला आले आहे. वास्तविक पंतप्रधान नरेंद्र मोदी जे काही करतात ते त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठी नसून केवळ देशहितासाठीच असते, हे जनताजनार्दन चांगले ओळखून आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात जनता कधीच बोलत नाही. मात्र मोदींना ठिकठिकाणी विरोध करणे हाच काँग्रेसच्या नेत्यांचा जीवनमार्ग झाल्यामुळे कोणीही मोदींचे कौतुक केले की काँग्रेसच्या तळपायाची आग मस्तकात जाणे साहजिकच आहे. मग काँग्रेसचे शशी थरुर यांनी मोदींचे केलेले कौतुक त्यांना कसे सहन होणार? भारतद्वेष आणि मोदीद्वेष यात फरक करण्याची काँग्रेसच्या नेत्यांची तयारी नाही हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### विस्तारवादी चीनला अद्दल घडवायलाच हवी

चीन हा नेहमीच पाकिस्तानची बाजू घेत आलेला आहे. दहशतवादाला पाठिंबा देतानाच त्याची पाठराखण करत आलेला आहे. प्रत्येक वेळी भारताविरुद्ध असलेली त्याची भूमिका काही नवीन नाही. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी त्याने पाकिस्तानला शस्त्रे पुरवली. या आधीही ''हिंदी चिनी भाई भाई'' म्हणत त्याने आपला विश्वासघात केलेला आहेच. आता तर तो उघडपणे भारताविरुद्ध पाकिस्तानला समर्थन देतो आहे. नुकतेच त्याने बांगलादेशला देखील कर्ज दिले आहे. मदतीच्या नावाखाली त्या देशाला शस्त्र विकणे आणि हळूहळू तिथे आपले हातपाय पसरून तो भाग गिळंकृत करणे ही चीन अर्थात ड्रॅगनची जुनीच खोड आहे. पण ही खोड जिरवणे आपल्या हातात आहे. कारण पाकिस्तान आणि बांगलादेशच्या सीमा भारताला लागून असल्यामुळे भारतासाठी ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे या ड्रॅगनच्या मुसक्या आवळून त्याच्या मुळावरच घाव करायला हवा आणि त्यासाठी त्याचा पाठीचा कणा मोडायला हवा. शत्रुराष्ट्राशी युद्ध हे केवळ शस्त्राने लढता येत असे नाही तर त्याची आर्थिक बाजू कमकुवत करून सुद्धा युद्ध जिंकता येते. भारतीय बाजारपेठ जर चीनच्या हातून आपण काढून घेतली तर या विस्तारवादी चीनचे कंबरडे मोडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी चीनच्या वस्तूंवर बहिष्कार घालायला हवा.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# न. प. च्यावतीने ५ स्टार हिंगोलीकर अभिनव उपक्रमांचे उद्‌घाटन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या संकल्पनेतून नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ५ स्टार हिंगोलीकर हा अभिनव उपक्रम हिंगोली शहरात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज नगर परिषद कार्यालय येथे ५ स्टार हिंगोलीकर या अभिनव उपक्रमाचे उदघाटन जिल्हाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये पर्यावरण जाणीव वाढवणे व शाश्वत विकासासाठी त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हा आहे. सदर अभिनव उपक्रमाअंतर्गत हिंगोली नगर परिषद कार्यक्षेत्रातील सर्व घरे शैक्षणिक व व्यवसयिक आस्थापना तसेच शासकीय कार्यालय यांनी जलपुनर्भरण, घराभोवती किमान ५ झाडे लावणे, घराम ध्येच कचऱ्याचे विलगीकरण, रुफटॉप सोलर पॅनल (पीएम सूर्यघर योजना), हिंगोली नगर परिषद मार्फत आकारण्यात येणाऱ्या करांचा नियमित व वेळेत भरणा अशा ५ बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर निकषांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उदघाटनप्रसंगी दिली.

याकरिता हिंगोली नगर परिषदे तर्फे प्रथमच बक्षीस योजना लागू केलेली असून प्रथम येणाऱ्या २०० पात्र मालमत्ता धारकांना रुपये ५००० बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. वरील बाबीनुसार शहरातील प्रत्येक घर व आस्थापनांचे सर्वेक्षण व तपासणी निवड समितीमार्फत करून त्याचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. यासाठी लागणारा मूल्यांकन फॉर्म नगर परिषद कार्यालयात उपलब्ध असून, फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ ठेवण्यात आलेली आहे. असे नगर परिषदे तर्फे सांगण्यात आले आहे. तसेच अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी मिळून पर्यावरणाचे संरक्षक व संवर्धन करण्यासाठी माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत हरित शपथ घेतली. तसेच जे नागरिक या पाच बाबी पूर्ण करतील अश्या नागरिकांना नगर परिषदेच्या करामध्ये सूट देण्याबाबत विचार करून निर्णय घेतला जाईल असे जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले.

यावेळी सहआयुक्त प्रदीप जगताप, उपमुख्याधिकारी श्याम माळवटकर, उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, उपमुख्याधिकारी सचिन पवार, नगर रचनाकार प्रदीप मोहकर, लेखापाल अनिकेत नाईक, लिंबाजी कुंभारकर, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, स्थापत्य अभियंता स्नेहल आवटे, अग्निशमन अधिकारी अक्षय तांडेल, संगणक अभियंता रामेश्वर चाटे, गोविंद चव्हाण, गोपाल गाडगे, वरिष्ठ लिपिक संजय दोडल, विनय साहू, संदीप घुगे, एजाज पठाण, कैलाश थिटे, राजेश दहाडे, अशा बंडगर, नितीन पाहिणकर, संघपाल नरवडे, कमलेश इंगळे, पंडित मस्के, प्रवीण चव्हाण, नागेश नरवाडे, देवीसिंग ठकूर, बाबुराव काळे, अशोक गवळी, विजय रामेश्वरे, संतोष मेंडके, मनोज भुर्से, शेख साजिद, नागरीक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# शिवसेना उबाठाच्यावतीने राज्य सरकारकडे संपूर्ण कर्जमाफीची मागणी

## राज्य सरकारच्या आश्वासनांची करून दिली आठवण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देणार यांसह इतर आश्वासने राज्य सरकारने दिली होती. परंतु अद्याप या आश्वासनाची पूर्ती राज्य सरकारकडून करण्यात न आल्याने शिवसेना उबाठाच्यावतीने क्या हुआ तेरा वादा? आंदोलन करीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यामार्फत राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनाची आठवण निवेदनाद्वारे करून देण्यात आली आहे.

भाजप, शिवसेना शिंदे गट तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचे आश्वासन तसेच शेतकरी सन्मान योजनेतून १५ हजार रूपये देणार, महिलांना २१०० रूपये दरमहा खात्यात टाकणार आदी आश्वासने दिली होती. परंतु सत्ता आल्यानंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही राज्य सरकारने या आश्वासनाची पूर्ती अद्याप केली नाही. राज्य सरकार खोटारडेपणा करीत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या विरोधात दि ५ जून रोजी शिवसेना उबाठाच्यावतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, उपजिल्हा प्रमुख परमेश्वर मांडगे, माजी जि प उपाध्यक्ष उध्दवराव गायकवाड यांच्यासह जिल्ह्यातील आजी माजी नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जि प सदस्य, तालुकाप्रमुख, संघटक, संपर्क प्रमुख, सहसंपर्क प्रमुख यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

# योगदिन उत्साहात साजरा करण्याचा पतंजली योग समितीचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**



पतंजली योग पिठाचे मुख्य केंद्रीय प्रभारी योग ऋषी स्वामी रामदेव यांचे परम शिष्य स्वामी परमार्थ देव यांच्या शिबिरासाठी उस्फूर्त सहभाग व सहकार्य दिल्याबद्दल पतंजलीचे राज्य प्रभारी दिनेश राठोड, राज्य युवा प्रभारी शंकर नागापुरे यांनी हिंगोलीकरांचे विशेष आभार मानुन योग दिन उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले.

येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत योग दिनाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंगोली जिल्हा संरक्षक कुंडलिकराव निर्मले यांनी प्रास्ताविक करताना पतंजलीच्या सर्व पदाधिकारी व साधकांसह आ. तानाजीराव मुटकुळे, माजी आमदार गजानन घुगे, डॉ. संतोष कल्याणकर, रामचंद्र कयाल, प्रमोद देशपांडे, सुनील देवडा, व्हि. डी. देशमुख,अशोक ठेंगल, गजेंद्र बियाणी, सुभाष तापडिया, बाबाराव बांगर, शितल तापडिया, अनंत जाधव, विलास काळे यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा विशेष नामोल्लेख त्यांनी केला. बैठकीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुका समितीचे पदाधिकारी देखील यावेळी उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतलेल्या सर्व पदाधिकारी व साधकांचा देखील यावेळी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. बैठकीचे सूत्रसंचालन विठ्ठल सोळंके यांनी तर आभार प्रदर्शन राजकुमार टिळे यांनी केले. बैठक यशस्वी होण्यासाठी उमेश तोष्णीवाल, एकनाथ बांगर, बालासाहेब हरण, संजय नाईक, तानाजी दासूद, बालाजी जाधव, जनक कदम, गंगाधर सरकटे, संजय देशमुख, वामन टाकळगव्हाणकर, ज्योती वाघमारे, निर्मला अर्धापुरे, पूजा चौरसिया आदींनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– मोदी सरकारचे ११ वर्ष निमित्त संकल्प से सिद्धीकार्यक्रम अंतर्गत आज ५ जून पर्यावरण दिनानिमित भाजपच्यावतीने यमुना निवास परिसरात वृक्षारोपण करण्यात आले तसेच तेथील नागरिकांना झाडे वाटप करण्यात आली यावेळी आ. तानाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, उमेश नागरे रजनीश पुरोहित, माणिक लोडे, शिवाजी मुटकुळे, संतोष टेकाळे, के के शिंदे, उमेश गुट्टे, प्रशांत सोनी, मनोज शर्मा, उत्तमराव जगताप, क्रिष्णा रूहीटीया, अमित रुहाटीया आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### लोकनेते स्व. मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अन्नदान



हिंगोली– श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान व नगराध्यक्ष बाबारावजी बांगर यांच्यावतीने संयुक्तपणे शासकीय रुग्णालय हिंगोली येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे पुण्यतिथीनिमित्त अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवर व रुग्णांचे नातेवाईक यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना विनम्र अभिवादन केले. उपस्थित रुग्णांच्या नातेवाईकांना व रुग्णांना भोजन वाटप आयोजकाच्यावतीनेकरण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे मेजर पंढरीनाथ घुगे, एकनाथ कुटे,संजय बांगर, संजय चाटे, गोपाल बांगर, राजकुमार मोरगे डॉ.विजय वाघ व साई माऊली मित्र मंडळ कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते कैलाश काबरा, प्रशांत उर्फ गोल्डी सोनी, रजनीश पुरोहित, मनोज शर्मा, धीरज शर्मा, कैलास शहाणे, निनाजी कांडेलकर, शिवानंद होकर्णे, आशिष शर्मा, पवन राठी, आनंद पतंगे, प्रकाश कुलकर्णी, संजय नरवणे उपस्थित होते.

### विना परवाना बियाणे खरेदी करू नये

हिंगोली– कापूस बियाणे बाजूच्या राज्यामधून तसेच बाजूच्या जिल्ह्यामधून पक्की पावती नसलेले कोणतेही बियाणे खरेदी करु नये. विशेषत: त्यामध्ये एचटीबीटी कापूस असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारे अवैधरित्या बियाणे खरेदी झाल्यास बियाणे अधिनियम १९६६ नुसार कारवाई होऊ शकते. तसेच अवैधरित्या बिना पावतीचे बियाणे खरेदी केल्यास उगवण शक्ती कमी निघाल्यास, बियाण्याची शुध्दता इत्यादी तक्रारीची दखल नियमानुसार घेता येत नाही आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ शकते. कापूस व इतर पिकांचे बियाणे जिल्ह्यामध्ये म ुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. शेतकरी बांधवांनी परवानाधारक विक्रेत्याकडूनच रितसर पक्की पावती घेऊन बियाणे खरेदी करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

### किडन्या घ्या, पणी बियाणांची व्यवस्था करा

हिंगोली– आगामी खरीप हंगामात पेरणीसाठी बँकेकडून कर्ज वितरीत केले जात नाही या परिस्थितीत शेतकरी आर्थिक संकटात असतांना पेरणीसाठी खते, बियाणे कसे खरेदी करावे अशी व्यथा मांडीत किडन्या घ्या पण बी, बियाणांची व्यवस्था करा अशी मागणी करणारे निवेदन ताकतोडा व गोरेगाव येथील शेतकरी दिपक सावके, अक्षय सावके, किशोर पतंगे, विजय कावरखे, संदीप मानमोठे, कैलास पतंगे यांच्यासह शेतकऱ्यांनी सेनगावचे तहसीलदार देवराव कारगुडे यांच्याकडे दिले आहे.

# नगर पालिकेच्यावतीने प्लास्टीक बंदीसाठी पथकांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**



येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात बसलेल्या फळ विक्रेते आणि भाजीपाला विक्रेत्यांकडून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकतांना तसेच सिंगल युज प्लास्टीकचा वापर करतांना आढळून आल्याने नगर पालिकेच्या पथकाने त्यांच्यावर कारवाई करीत दंड वसूल केला तसेच कठोर कारवाईचा इशारा दिला.

पर्यावरणाला धोकादायक अशा सिंगल युज प्लास्टीकचा वापर बंदीसाठी नगर पालिकेच्या पथकाच्यावतीने शहरातील व्यापाऱ्यांवर करवाई करण्यात येत आहे. दि ४ जून रोजी येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशालाच्या परिसरात बसलेल्या भाजीपाला विक्रेते आणि फळविक्रेते येथील उघड्यावर कचरा टाकत असल्यामुळे याठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरत असल्याचे तसेच सिंगल युज प्लास्टीकचा सर्रास वापर करीत असल्याची माहीती नगर पालिकेच्या पथकाला मिळाल्यानंतर मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, अथर्व वर्मा, रवी गायकवाड, कुणाल कांबळे, चेतन भुजवणे यांचय पथकाने तत्काळ कारवई करीत संबंधीत व्यापारयांना दंड आकारला.

# आधुनिक पध्दतीने शेती करून आर्थिक विकास साधावा– जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ जून**

शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीऐवजी आधुनिक पध्दतीने शेती करून आर्थिक विकास साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष सावरखेडा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तालुक्यातील सावरखेडा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली तसेच गावातील काही शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच मशागतीपासून ते काढणीपर्यंत सर्व माहीती धेत कोणत्या पिकांची पेरणी जास्त प्रमाणात होते. त्यासाठी होणारा खर्च याची माहीतीही घेतली. शेतकऱ्यांसोबत चर्चा करून शेती संबंधी शेतजमीन, विविध पीक, वेगवेगळ्या पिकांसाठी पूरक व्यवस्था, पेरणी–नागरणीसाठी योग्य काळ, पाऊस–पाणी, शेतीसाठी यंत्र, शेनखत, शेतकऱ्यांची शेती करण्याची पद्धती आदी माहिती घेतली. शेतकऱ्यांनीही जिल्हाधिकारी गुप्ता यांना संपूर्ण माहीती देत त्यांच्या अडचणी मांडल्या. यावेळी शेतकरी जगन्नाथ बाबुराव हरण, रामदास लक्षण हरण, कृष्णा तातेराव हरण यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी पारंपारी शेतीएवजी आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे आवाहन केले. शेती सोबतच शेती पुरक व्यवसाय, जोडधंदा करावा. शासनाच्या कृषी विषयक योजनांचा लाभ घेऊन एकरी उत्पादनात वाढ करून आर्थिक विकास साधण्याचे आवाहन केले. कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकऱ्यांसठी असलेल्या योजनांबाबत जनजागृती करून योजनांचा शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिल्या.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर एस कदम, तालुका कृषी अधिकारी ए. एस. मुळे, कृषि पर्यवेक्षक गणेश पवार, ग्राम महसूल अधिकारी विनोद गादेकर, कृषी सहाय्यक शरद राठोड, जी. एस. वंजारे, गणेश इंगळे, सरपंच पांडुरंग हरण, नागोराव शिंदे, निलेश पाईकराव आदी शेतकरी उपस्थित होते.

# अभ्यासाचे नियोजन आणि आत्मविश्वास हीच यशाची गुरूकिल्ली– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ४ जून**

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवायचे असेल तर अभ्यासाच्या वेळापत्रकाचे नियोजन, सातत्य, सराव आणि आत्मविश्वास ठेवल्यास कुठलेही ध्येय सहज साध्य करता येते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शिवाजीराव देशमुख सभागृह येथे नुकत्याच आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा प्रसंगी बोलताना केले.



जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या वतीने जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या मार्गदर्शनामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतःचे वैयक्तिक अनुभव सांगताना विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. परीक्षेकरिता उपलब्ध असणारा कालावधी आणि त्या अनुषंगाने अभ्यासाचे, वेळेचे नियोजन, केलेल्या अभ्यासाचा सारांश आणि त्याचा सराव, जास्तीत जास्त प्रश्नपत्रिकांचा सराव आणि त्यातून स्वतःची गुणवत्ता पारखणे आवश्यक आहे. याचबरोबर स्वतःवरील खंबीर आत्मविश्वास, इतरांशी तुलना न करता केवळ स्वतःवर लक्ष केंद्रित करून परीक्षांना सामोरे जा. एका प्रयत्नात यश मिळाले नाही तरी खचून न जाता अधिक उमेदीने पुन्हा तयारीला लागा. तुम्हाला यश नक्कीच मिळेल, असा विश्वास देखील जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी व्यक्त केला.

या चर्चासत्राला शहरातील स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमप्रतिनिधी प्रद्युम्न गिरीकर यांनी केले. दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी मार्गदर्शन कार्यशाळा स्पर्धा परीक्षा मधून यश मिळवून शासकीय सेवेत कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत महिन्याच्या पहिल्या बुधवारी अशा प्रकारचे चर्चासत्र, कार्यशाळा आयोजित करण्याचा संकल्प यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अनुभवी व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर त्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणे अधिक सोपे जाईल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे हिंगाली जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल. त्यांना शहरातच योग्य मार्गदर्शन मिळाल्यास शासकीय नोकरीमध्ये हिंगोलीकर विद्यार्थ्यांचा टक्का वाढेल, आणि इतरांनाही त्यांच्यापासून प्रेरणा मिळेल, असेही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

# पत्रकारावर हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

सेनगाव तालुक्यातील अवैध वाळू उपसा करून वाहतुकीची बातमी देणाऱ्या पत्रकार रामेश्वर पाले व त्यांचे मित्र पंजाब शिंदे यांना दि ४ जून रोजी वटकळीकडे गावी जात असतांना भानखेडा शिवारातील घाटाजवळ एका चारचाकी वाहनातून आलेल्या काही व्यक्तींनी त्यांच्या दुचाकीसमोर वाहन उभे केले. त्यानंतर पोले यांना वाळू उपशासंबंधी बातमी का दिली या कारणावरून तलवार व लोखंडी रॉडने मारहाण केली. तसेच पंजाब शिंदे यांनाही लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यांना तातडीने उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# स्थागुशाने केले ९ लाखांचे गोवंश जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०५ जून -**

पिकअप वाहनामध्ये कतलीच्या उद्देशाने घेवून जात असलेले गोवंश जातीचे १५ जनावरे व वाहन असा ९ लाख ५ हजार रूपयांचा ऐवज स्थानीक गुन्हा शाखेने आज जप्त करून कांही अरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेली जनावरे देखिल पोलीसांनी जप्त केली आहेत.

नांदेड ग्रामीण व मुदखेड पोलीस ठाण्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरिक्षक महेश कोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई यशस्वी केली. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मिल्लतनगर भागात काही जनावरे कतलीसाठी घेवून जाणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराव यांना मिळाली. त्यांनुसार त्यांनी मिलींद सोनकांबळे व सहकाऱ्यांना कळवले. त्यानुसार सकाळी ९ वाजता सापळा लावला. महिंद्रा बोलेरो पिकप क्र. एमएच २६ बीई ३३९८ ही भरदाव वेगात येत असतांना पोलीसांना त्यांनी चकमा देवून





पळ काढला. त्यानंतर पाठलाग केल्यानंतर त्यातील दोन इसम पळुन गेले. त्यात असलेले आठ गोवंशीय जातीचे जनावरे व बोलेरो पिकप पोलीसांनी जप्त केला. तसेच मुदखेड येथे कुरेशी मोहल्ला येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जातीचे कांही जनावरे कतल करण्यासाठी डामुन ठेवण्यात आली होती.

**ग्रामीण पोलीसांनी केले**

आज दुपारी १२ वाजता सदरची जनावरे जप्त करून अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. यात वाहन चालक, आणोळखी दोन इसम तसेच शेख इम्रान शेख महेबुब रा. मुदखेड यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

**५० हजाराचे गोवंश जप्त**

ग्रामीण पोलीसांनी दि.४ जुन रोजी बळीरामपुर परीसरातुन शेख सलमान शेख अक्रम याच्याकडुन दोन गोवंश जप्त केले असुन त्यांची किंमत ५५ हजार रुपये आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नायगांव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी संजय मिरजकर

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.०५ जून -**

नायगांव तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एल. आर. वाजे यांची पंचायत समिती भूम जि. धाराशीव येथे प्रशासकीय बदली झाली असून.त्यांच्या जागी जिल्हा परीषदेतील सहाय्यक प्रकल्प अधिकारी संजय मिरजकर यांची प्रभारी गट विकास अधिकारी पदावर नव्यानेच नियुक्ती देण्यात आले असुन. मिरजकरांनी गुरुवारी सकाळी पदभार स्वीकारला आहे.

येथे नव्याने रुजू झालेले प्रभारी गट विकास अधिकारी हे मागील काही काळापूर्वी नायगाव पंचायत समिती कार्यालयात सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून रुजू होते मात्र त्यांनी प्रतिनियुक्ती वर जिल्हा परिषद नांदेड येथे सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले आता येथील गटविकास अधिकारी एल.आर. वाजे यांची प्रशासकीय बदली झाल्यामुळे त्यांना नायगावचे प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड यांनी नियुक्ती दिली असल्याची माहिती पं .स. व्यवस्थापनाने दिली असून आज येथील कर्मचाऱ्यांनी नूतन प्रभारी गटविकास अधिकारी संजय मिरजकर व बदलीवर गेलेले गटविकास अधिकारी एल.आर. यांचा सन्मान केला यावेळी विस्तार अधिकारी महेश मुखेडकर , कार्यालयीन अधिक्षक मुंडकर, ठाकूर, अडकिने , शेख , नरेगा विभागाचे प्रमुख कदम, रानवळकर आदींची उपस्थिती होती . दरम्यान येथील पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी संजीव नीलमवार यांची धर्मवाद येथे बदली झाली असल्यामुळे त्यांच्या जागी बिलोली पंचायत समिती येथून प्रकाश जाधव हे रुजू झाले आहेत , तसेच येथील सहाय्यक प्रशासन अधिकारी अमोल टोम्पे यांची बदली किनवट येथे झाली असून त्यांच्या जागेवर नागेश सिंदगीकर हे रुजू झाले त्याचबरोबर कनिष्ठ लिपीक बालाजी आष्टूरे यांची बदली प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगाव (पि.) ता. मुखेड येथे झाली असून त्यांच्या जागेवर उमरी पंचायत समिती कार्यालयातून अजय कुलकर्णी हे रुजू झाले आहेत .

## संक्षिप्त वृत्त

### सिडको झोन येते स्वच्छ भारत हरित भारत हरित प्रतिज्ञाचे वाचन

**नवीन नांदेड-** सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे स्वच्छ भारत हरित भारत हरित प्रतिज्ञाचे वाचन दिनांक ४ जुन रोजी करून शपथ घेण्यात आली ही मोहीम दिनांक १ ते ५ जून पर्यंत शहरातील अन्य झोनमध्ये घेणार घेण्यात येणार आहे.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत सिडको झोन येथ स्वच्छ महाराष्ट्र अभियानाद्वारे जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन करून आपली नगरी स्वच्छ व सुंदर करण्याची व ठेवण्याची प्रतिज्ञा नांदेड मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ४ जून रोजी सिडको झोन येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत शपथ घेण्यात आली. यावेळी मोहम्मद जिलानी, प्रवीण जोंधळे, करनिरक्षक वसंत कल्याणकर ,मारोती सारंग, विवेकानंद लोखंडे, मालू यनफळे, नारायण आठवले, उत्तम जोंधळे, विठ्ठल आंबटवार, नरेंद्र सिंगे, अशोक भंडारे, प्रशांत चावरे, जयराम सूर्यवंशी, नथुराम चौरे, संकेत वाटोरे, श्याम आरकुले, मदन बैस, अर्चना जोंधळे, मीना अडबलवार, मुक्ताबाई धर्मेकर यांच्यासह सिडको क्षेत्रीय कार्यालय येथील सर्व अधिकारी ,कर्मचारी यांनी उपस्थित राहून पर्यावरणाची शपथ घेतली.



### खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते अयुब पठाण यांना नवरत्न पुरस्कार प्रदान

**नांदेड** -येथील छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम सेवा संघाचे अध्यक्ष अयुब पठाण यांना महाराष्ट्र पत्रकार संघाचा नवरत्न पुरस्कार खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते नुकताच कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आला. नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष तथा वरिष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे व महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष विलासराव कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र पत्रकार संघा चे २१ वे अधिवेश कोल्हापूर येथील संजय घोडावत विद्यापीठ परिसरात ओयोजित करण्यात आले होते. यावेळी कोल्हापूर जिल्हा पोलिस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता,कोल्हापूर ज्येष्ठ पत्रकार हवालदार मोहनराव, राजकुमार चौगुले, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अनिल उपाध्ये, सुनील कांबळे, बाबासाहेब राशीनकर, संतोष भोसले, नामदेव कुंभार, सुनील पाटील, गोपाळ पाटील यावेळी उपस्थित होते.



### अशोक पाटील साखरे यांच निधन

**नरसी** -नायगांव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी जेष्ठ नागरिक अशोक बसवंतराव पाटील साखरे वय ६५ वर्ष यांच दि.४ जुन २०२५ रोजी बुधवारी दुपारी ३ वाजता निधन झाले आहे. अशोक साखरे यांच्या पार्थिवावर दि. ५ जुन रोजी गुरुवारी सकाळी ११ वाजता नरसी ता.नायगाल जि. नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुल, दोन मुली, सुना, जावाई, नातू असा मोठा परिवार आहे. ते राजेश साखरे व श्रीपत साखरे यांचे वडील होत तर सामाजिक कार्यकर्ते शुभम साखरे यांचे ते काका होत.



# पेंशन अदालत

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०५ जून -**

जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या तसेच आगामी सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीविषयक तक्रारी, अडचणी तसेच शंका दूर करण्यासाठी पेंशन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही पेंशन अदालत मंगळवार दिनांक १० जून रोजी, सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडणार आहे. याचा सर्व संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी केले आहे.

# छ. शिवाजी हायस्कूलच्या नृत्य विभागाचा 'लंबाडी' ठसका; गोव्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान

**तभा वृतसेवा**
**सगरोळी, दि.०५ जून -**

छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या नृत्य विभागाने आपल्या कसदार सादरीकरणातून आंतरराष्ट्रीय मंचावर आपली छाप पाडत प्रथम क्रमांक पटकावला आहे. सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन आणि अखिल नटराजम आंतरसंस्कृती संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोवा येथील बोंढारकर मार्ग, पणजी येथे दिनांक २ ते ५ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी 'लंबाडी' नृत्य सादर केले.




लहान गटातून सादर करण्यात आलेल्या या लोककला सादरीकरणाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून, हायस्कूलच्या सांस्कृतिक विभागाच्या इतिहासातील हे एक ऐतिहासिक यश ठरले आहे. या यशामागे व्यवस्थापक गोविंद बोधनकर, नृत्य प्रशिक्षक पंकज कंधारे आणि त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. कंधारे यांचे निःस्वार्थ मार्गदर्शन लाभले.

या गौरवप्रसंगी संस्थेचे कुटुंबप्रमुख आदरणीय अण्णा, संचालक रोहित देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते, शैक्षणिक समन्वयिका श्रद्धा देशमुख यांनी नृत्यगटातील बालकलाकारांचे व त्यांना घडवणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# शासनाचा अधिकृत आवास प्लस ॲप अडकला तांत्रिक अडचणीत

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०५ जून -**

३१ डिसेंबर या फॉर्म भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत शासनाच्या अधिकृत आवास प्लस या पच्या माध्यमातून नोंदणी करताना घरकुल लाभासाठी पात्र असताना देखील केवळ पच्या तांत्रिक अडचणीमुळे नोंदणी न झाल्याने अनेक पात्र लाभार्थ्यांना आपल्या हक्काच्या पक्क्या घरापासून वंचित राहण्याची गंभीर वेळ आली असल्याने जिल्ह्यातील लाभार्थ्यांना नोंदणी करिता मुदतवाढ द्यावी, अशी विनंतीवजा मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रधानमंत्री घरकुल आवास योजना २०२५ मार्फत महाराष्ट्रात waasPlus pp मार्फत ऑनलाईन फॉर्म भरले जात आहेत. राहण्यासाठी घर नसलेल्या किंवा घरकुल योजनेसाठी पात्र असलेल्या नागरिकांना घरबसल्या मोबाईल मधून प्रधानमंत्री घरकुल आवास योजना महाराष्ट्र ग्रामीण व शहरीसाठी waasPlus pp मधुन ऑनलाईन फॉर्म भरायला सांगितले जात आहे. पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने आवास प्लस अँप च्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज करतायेत.परंतु, आवास प्लस प मध्ये आधीच एकीकडे तांत्रिक अडचणी येत असतानाच मात्र दुसरीकडे ३१ डिसेंबर ही अर्ज करण्याची शेवटची तारीख निघून गेल्याने या आवास प्लस पच्या तांत्रिक अडचणीचा जबरदस्त फटका केवळ पच्या तांत्रिक अडचणी मुळे अनेक पात्र लाभार्थ्यांना बसला.परिणामी अनेकांना आपल्या हक्काच्या घरकुलापासून मुकण्याची गंभीर वेळ आली आहे. माहूर तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक दुर्बल घटकांना देखील शासनाकडून देण्यात येणारे घरकुल पात्र लाभार्थ्यांना अधिकृत आवास प्लस या पद्वारे नोंदणी करण्या साठी दिनांक ३१/०५/२०२५ ही शेवटची तारीख देण्यात आली होती.परंतु, आवास प्लस पच्या तांत्रिक अडचणी मुळे अनेक पात्र लाभार्थ्यांची नोंदणी होऊ शकलेली नाही.त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून,आवास प्लस आप द्वारे करण्यात येणाऱ्या नोंदणीसाठीचा कालावधी वाढवून मुदतवाढ देण्यात यावी,अशी विनंतीवजा मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांसह शक्तीसिंह परमार मनसे विद्यार्थी, अमर कोंडराज शहर उपाध्यक्ष, नांदेड यांनी दिवेदनाद्वारे केली आहे.

# शेती जमीन लागवडीसाठी योग्य व्हावी; शेतकऱ्यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृतसेवा**
**बिलोली , दि.०५ जून -**

तालुक्यातील सगरोळी हद्दितील मांजरा नदी पात्रात असलेली गट क्रं.५०६ मधील ०.६१ हे.आर शेतजमीन असून ही जमीन लागवडीसाठी योग्य करण्याकरीता शेत जमीनीत जमा झालेली २१७८ ब्रास वाळू रेती निष्कासन करण्याबाबत देविदास मारोती देगलुरे रा.सगरोळी यांनी परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता.या नुसार सदर प्रस्तावास संबंधित प्रशासनाने घालून दिलेल्या अटी व नियमा नुसार मान्यता दिली आहे.



सध्या लागलागवडीचे दिवस जवळ आल्याने वरील प्रमाणे जमीनी मधील रेती काढण्यासाठी गेल्या आठ दिवसा पासून संबंधिता कडून काम चालू आहे.हे काम करीत असतांना वेळप्रसंगी महसुल प्रशासना कडून कोणता दंड आकारण्यात येऊ नये या बाबत शेतकरी विशेष काळजी घेत आहे. सध्या प्रशासना कडून ज्या कांही घालून दिलेल्या अटी आहेत त्याचे पालन होत असल्याने आजतागायत कोणतीही तक्रार करण्यात नाही असे समजते.एरव्ही नावालाच काम करणारे पथक यावेळी मात्र जागेवर असल्याचे पाहवयास मिळाले. सध्या घरकुलाचा प्रश्न निर्माण झाला असून याच ठिकाणी घरकुल धारकांना रेती मिळावी अशी मागणी होत आहे.सगरोळी गावच्या पायथ्याशी मांजरा नदी असून यानदीच्या शेजारी कांही तुरळक प्रमाणात अधिकृतपणे सातबारे असलेल्या जमिनी नावालाच असून त्यात कोणतेही उत्पन्न घेता येत नाही अशात आता जिल्हा महसुल विभागाने शेतकरी देविदास देगलुरे यांना त्यांची जमिन मोकळी व्हावी या उद्देशाने रेती काढण्याची परवानगी दिली आहे.

# यशस्वी मुलांचा नागरी सत्कार

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि.०५ जून -**

मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथील विद्यमान सक्रीय युवा सरपंच डॉ.रणजित काळे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या वतीने नागपूर पोलीस दलात निवड झालेल्या चि.सचिन अशोक जाधव व ग्रामीण भागातून कष्ट करीत चंदीगड(हरियाणा-पंजाब) येथे आयआयटी महाविद्यालयात प्रवेश मिळविलेल्या अभिजित किशन कांबळे या दोघां यशस्वी मुलांचा मंगळवार दि.३ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालयात भव्य नागरी सत्कार करण्यात आला. येथील भूमिपुत्र अशोक जाधव पाटील व किशनराव कांबळे यांनी शेतीमातीत कष्ट करीत आपल्या मुलांना घडविले आहे.त्यांच्या अथक कष्टांची प्रेरणा खरब खंडगांव तथा तालुका परिसरातील मुलांनी घ्यावी, हे ध्येय उराशी बाळगून उपक्रमशील सरपंच डॉ.रणजित काळे पाटील यांनी हा सदरील सत्कार घडवून आणला.यशस्वी मुलांसह आई वडील तसेच गाव परिसरातील नागरिकांना अभिमान वाटावा असा आनंदायी प्रसंग सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्र सांभाळत सरपंचांनी पुढाकार घेऊन वाटून घेतल्याने त्यांचे कौतुकही होत आहे.

# नदीत रस्ता बनविण्यासाठी जाणारी जेसीबी,हायवा वाहने पकडली
# शासनाच्या मोफत वाळू वाटप धोरणाला फासली हरताळ

**तभा वृतसेवा**
**माहुर , दि.०५ जून -**

महाराष्ट्र शासनाच्या घरकुलधारकांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याच्या आवाहनानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशान्वये तत्कालीन तहसीलदार किशोर यादव यांनी मौजे पडसा येथून जिल्ह्यातून सर्वप्रथम मोफत वाळू वाटपाचा शुभारंभ केला होता. त्याच ठिकाणावरून माहूर शहरासह तालुक्यातील इतर १५ गावांना आज दि. ५ जून २०२५ रोजी पासून वाळू वाटप कार्यक्रमाचा नुकतेच रुजू झालेले तहसीलदार मुगाजी काकडे यांच्या हस्ते शुभारंभ होणार होता. त्याआधी रस्ता बनविण्यासाठी तसेच लाभार्थ्यांसाठी काही रेतीसाठा नदीच्या वर आणून ठेवण्याच्या तहसीलदारांच्या तोंडी आदेशाने नदीत जात असलेले जेसीबी आणि नदित असलेले हायवा वाहन सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोंथूला यांनी अर्ध्या रात्रीपासून नदीत बसून पाळत ठेवत ही वाहने पकडून तहसील कार्यालयात जमा केल्याने शासनाच्या मोफत वाळू वाटप धोरणाला एका प्रकारे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी धक्का दिल्याची चर्चा माहूर तालुक्यात सुरू आहे. विशेष म्हणजे वाळू वाटपाची मुदत संपायला जेमतेम तीनच दिवस उरल्याने शासनाच्या उद्देशास हरताळ फासले जाऊन हजारो घरकुलधारक पावसाळा उघड्यावर कसा काढतील? असा बिकट प्रश्न यामुळे निर्माण झाला असून, हा विषय आता गंभीर स्वरूप धारण करत चालला आहे.



महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मोफत वाळू वाटप योजनेला मोठा गाजावाजा करून सुरुवात करण्यात आली. परंतु माहूर तालुक्यातील फक्त एकाच गावातील काही घरकुलधारकांना प्रत्यक्षात वाळू देण्यात आली. त्यासाठी तहसीलदारांनी वाळू व्यवसायिकांना हाताशी धरून रस्ता बनविण्यास सांगितले होते. कर्मचाऱ्यांनी सकाळी सहा वाजता रस्ता बनवा आणि दहा वाजता तहसीलदार येऊन मोफत वाळू वाटपाचा शुभारंभ करतील! असे दूरध्वनीवरून सांगितल्याची रेकॉर्डिंग अनेक व्हाट्सअप ग्रुप वर व्हायरल झालेली आहे. या क्लिपमध्ये व्यवसायिकाची कुठलीच चूक नाही तरीही त्यांचे हायवा,जेसीबी वाहन जप्त करण्यात आले असून,सहाय्यक जिल्हाधिकारी आणि तहसीलदार हे नियमाप्रमाणे मोफत वाळू वाटपाचा शुभारंभ करणार असताना सहायक जिल्हाधिकाऱ्यांनी मात्र शासनाच्या आदेशाला धाब्यावर बसवून तहसीलदारांची नाचक्की करण्याचा प्रकार घडवल्याने एकीकडे व्यावसायिक मात्र बर्बाद झाले तर दुसरीकडे हजारो घरकुलधारकांना ऐण पावसाळ्यात उघड्यावर राहण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

माहूर शहरातील शेकडो घरकुल आणि तालुक्यातील सात हजारांवर घरकुले अर्धवट स्थितीत उभी असून यातील कोणालाही वाळू मिळत नसल्याने पंधरा हजार रुपये ब्रासची लाल-पिवळी वाळू घेऊन बांधकाम करणे शक्य होत नाहीये. यामुळे

हजारो घरकुलधारकांच्या पावसाळ्याच्या तोंडावर तोंडचे पाणी पळाले असून तहसीलदार शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी निघाले असताना सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी ही वाहने धरून अधिकाऱ्यांसह व्यवसायिकांची गोची केल्याने आता वाळू कुठून उपलब्ध करावी? हा प्रश्न घरकूल लाभार्थ्यांना भेडसावत आहे.

विशेष म्हणजे उरलेल्या तीन दिवसात आता हजारो ब्रास वाळू गोरगरीब घरकुलधारकांना कुठून उपलब्ध करून देणार ? हा प्रश्न सध्या तरी अनुत्तरीत असला तरीही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी याप्रकरणी तात्काळ लक्ष घालून, निर्माण झालेल्या कमी निर्माण केलेल्या या विचित्र समस्येवर उचित तोडगा काढून घरकुलधारकांना मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी,अशा मागणीचाआर्त टाहो बिचाऱ्या घरकुलधारकांनी फोडला आहे.

# किनवट नगरपरिषदेच्या वतीने वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि.०५ जून -**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त किनवट नगरपरिषदेच्या वतीने वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ आज उत्साहात करण्यात आला. या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाची सामूहिक शपथ घेण्यात आली, तसेच विविध देशी झाडांच्या प्रजातींची लागवड करून वृक्ष लागवड महोत्सवाला सुरुवात झाली. केंद्र आणि राज्य शासनाने दिलेल्या २५,००० झाडे लावण्याच्या उद्दिष्टाला गती देण्यासाठी नगरपरिषदेने स्वतःची रोपवाटिका स्थापन केली असून, यामध्ये देशी प्रजातींची असंख्य रोपे तयार करण्यात येत आहेत.

या वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपाध्यक्ष व्यंकट नेम्मानीवार, शिक्षण



मंडळ सदस्य बाळकृष्ण कदम, भाजपा मंडळ अध्यक्ष उमाकांत क-हाळे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, ड. माज बडगुजर, ज्येष्ठ पत्रकार फुलाजी गरड, मधुकर अन्नेलवार, संतोष अनंतवार, प्रमोद पोहरकर, ॲड. नैतिक नाईक, यांच्यासह नगरपरिषदेचे लेखापाल चक्रपाणी कदम, स्थापत्य अभियंता सूरज साकळे, सुधीर सरोदे, कर विभाग प्रमुख मिलिंद घुले, कैलास काईतवाड, विष्णू पुजारी, किरण कलगोटुवार, परमेश्वर काचमोडे, विजया वाघमारे, अजहरअली ताहेरअली, शेख तोफीक, शेख अतिक, अब्दुल अल्ताफ, राजू पिल्लेवार, लक्ष्मण कोल्हे, व्यंकटेश मुकनेपेल्लीवार, निखिल वाघाडे, संदीप ढंडोरे, ऐश्वर्या धात्रक, राजू उदगिरवार, गंगाधर दोनपेल्लीवार, रजनीकांत राईंचवार, संकेत गटलेवार, सर्वेश अनलावार, साहिल काशेटवार, किरण दुधीवार, राजेश ब्राम्हणे, गजानन राठोड यांच्यासह अनेक कर्मचारी आणि अधिकारी उपस्थित होते.

**नगरपरिषदेचा २५ हजार झाडे लावण्याचा संकल्प**

नगरपरिषदेचा २५,००० झाडे लावण्याचा संकल्प आहे. यासाठी आम्ही स्वतःची रोपवाटिका उभारत आहोत. नागरिकांनी या वृक्ष लागवड मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणाला हातभार लावावा असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी केले.

**नागरिकांना आवाहन**

नगरपरिषदेने सर्व नागरिकांना या वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावावे आणि त्याची काळजी घ्यावी, अशी विनंती डॉ. अजय कुरवाडे यांनी केली आहे. या मोहिमेद्वारे किनवट शहर हिरवेगार आणि पर्यावरणस्नेही बनविण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे.


Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439

## संक्षिप्त वृत्त...

### सेलू उपजिल्हा रुग्णालयातील महा डायलिसिस विभाग कार्यान्वित

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील उपजिल्हा रुग्णालयात महालॅबतर्फे सोमवार २ जून पासून महाडायलिसीस विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिक्षक डॉ. जनार्दन गोळेगावकर यांच्या प्रयत्नातून १० एप्रिल रोजी पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याहस्ते या महाडायलिसीस विभागाचे उद्घाटन करण्यात आले होते. हा डायलेसिस विभाग आज २ जून रोजी कार्यान्वित झाला आहे. हा महा डायलिसिस विभाग उपजिल्हा रुग्णालयांमध्ये बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत म्हणजेच महालॅब मार्फत चालवण्यात येत आहे. ज्या ठिकाणी डायलेसिस टेक्निशियन आकाश जाधव, स्टाफ नर्स शिवकन्या काळे या कार्यरत आहेत.

या विभागामध्ये आज सीमा सहदेव काळे (वय २५ वर्ष राहणार डेंगळे पिंपळगाव) या रुग्णास डायलेसिस करण्यात आले. संबंधित रुग्णाला आठवड्यातून दोनदा सोमवार आणि गुरुवार रोजी डायलिसिस करण्यात येणार आहे. या रुग्णाला डायलिसिस करण्याकरता उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच टेक्निशियन आणि स्टाफ नर्स यांनी सहकार्य केले. दरम्यान, सेलू शहर व परिसरातील ज्या रुग्णांना डायलिसिसची आवश्यकता आहे अशा रुग्णांनी उपजिल्हा रुग्णालय सेलू येथील डायलेसिस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. जनार्दन गोळेगावकर यांनी केले आहे.

### खरीप पूर्व मशागतीच्या कामांना वेग मजुराअभावी मशागतीची कामे यंत्राने

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** शेतीतील मशागती कामांना वेग एप्रिल संपूनही मे महिन्याचे चार आठवडे झालेत तरीही शेतीतील मशागतीची कामे बहुतांशी शेतकरी यंत्राच्या सहाय्याने व ट्रॅक्टरच्या साह्याने करत आहेत. पूर्वी मशागतीचे कामे नांगरणी करण्यासाठी कुठे चार बैल तर कुठे सहा बैलाच नांगर दिसत असे, मात्र सत्य परिस्थिती अशी दिसत नसून मजुराचा व बैलांचा अभाव असल्या कारणाने शेतकरी आता ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीतील मशागतीची कामे करण्यासाठी तो सद्य स्थितीमध्ये शेत शिवारात मग्न दिसत आहे.

पराठी जमा करणे , काश्या वेचने, ज्वारीचे धसकट वेचेणे यासाठी पूर्वी महिला मजूर मिळत असे मात्र दिवसेंदिवस मजुरांचा अभाव असल्यामुळे शेतकरी रोटावेटर च्या साह्याने ज्वारीचे धसकट, शेतातीलकाडी कचरा बारीक, करण्यासाठी सरास रोटावेटरचा वापर होत आहे. बोटावर मोजणे इतकेचं कामे मजुराच्या साह्याने केली जात आहेत. आज स्थितीला बैलाचे वाढले भाव त्यांना सांभाळण्यासाठी लागणारी कसरत आणि चारापाणी याचा आर्थिक हिशोब ठेवला तर बहुतांश अल्प भूधारक शेतकऱ्यांना बैल जोडी परवडत नाही.त्यामुळे बहुतांश शेतकरी दुसऱ्याच्या बैलाच्या साह्याने आपली आंतरमशागतीची कामे पैसे देऊन करून घेतात. याचा परिणाम आंतरमशाबादीची कामे वेळेवर होत नाहीत.त्यामुळे उत्पन्नात घट होण्याची शक्यता असते. त्यामुळे बहुतांश शेतकरी यंत्राच्या साह्याने शेती करत आहेत.

### लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटीची कार्यकारिणी जाहीर

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** शहरातील समर्थ हॉटेल येथे लॉयन्स क्लब गंगाखेड गोल्डसिटीची बैठक (दिनांक ३० मे शुक्रवार) रोजी झोन चेअरपर्सन लॉ.अतुल गंजेवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली या बैठकीमध्ये येणाऱ्या २०२५- २६नवीन वर्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

सर्वानुमते अध्यक्ष म्हणून लॉ.संजय धारे(रुद्रवार), सचिव म्हणून लॉ.गोपाल मंत्री, कोषाध्यक्ष म्हणून लॉ.नानासाहेब पाटील,प्रथम उपाध्यक्ष लॉ.बाळासाहेब यादव,द्वितीय उपाध्यक्ष लॉ.चंद्रकांत गादेवार यांचे नावे जाहीर करण्यात आले. या नवनियुक्त कार्यकारणीचा शपथविधी सोहळा येणाऱ्या जुलै महिन्यात मोठ्या दिमाखात पार पडणार असल्याची माहिती झेडसी लॉ.गंजेवार यांनी दिली. या बैठकीस मावळते उपाध्यक्ष लॉ.बाळासाहेब यादव, कॅबिनेट ऑफिसर लॉ.गोविंदराज रोडे,कोषाध्यक्ष लॉ.अभिनय नळदकर, अध्यक्ष लॉ. जगदीश तोतला, कॅबिनेट ऑफिसर लॉ.संजय सुपेकर, सचिव लॉ.भगत सुरवसे, उपाध्यक्ष लॉ.चंद्रकांत गादेवार, झोन चेअरपर्सन लॉ.अतुल गंजेवार, लॉ.राजू लांडगे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त तीनशे सूर्यनमस्काराची मानवंदना

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** येथील स्वदेशी आखाडाच्या वतीने (दिनांक ३१ मे शनिवार) रोजी लोकमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती तथा त्रिशताब्दी जन्मोत्सव २०२५ ब्रह्म मुहूर्तावर साजरा करण्यात आला जयंती निमित्त योगगुरु प्रकाश डीकले यांच्या नेतृत्वाखाली एक दिवशीय योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

सदरील कार्यक्रमादरम्यान अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अहिल्या वंदना अहिल्यादेवीची आरती शंखनाद तसेच ३०० वी जयंती असल्यामुळे ३०० सूर्यनमस्काराची मानवंदना राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना देण्यात आली याप्रसंगी श्री नरेंद्र गिरी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार, उद्योजक संजय धुळे, योग शिक्षक लक्ष्मण निरस,विनायक राठोड, राजाभाऊ खोडवे रॉयल अकॅडमीचे संचालक गणेश नागरगोजे, विद्यार्थी, मॉर्निंग ग्रुपचे सदस्य जिल्हा परिषदेचे माजी सभापती श्रीनिवास मुंडे,अतुल गंजेवार, अय्या,डहाळे, कृष्णाजी सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी अकॅडमीतील विद्यार्थ्यांना स्वदेशी आखाड्याच्या वतीने सूर्य नमस्कार पूस्तके तसेच प्रा.आसुरे सरांच्या वतीने शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या ५० प्रती भेट देण्यात आल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आखाड्याचे संचालक योगगुरू प्रकाश डिकळे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# केंद्रीय कृषि मंत्री चौहान आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पुणे 'ॲग्री हॅकेथॉन'मध्ये कुलगुरू यांचा सुपर ज्युरी म्हणून सन्मान

## पूणे येथे भारतातील पहिले ॲग्री हॅकेथॉन कार्यक्रमांचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी-** पुणे येथे भारतातील पहिले पुणे ॲग्री हॅकेथॉन आयोजित करण्यात आले होते. या हॅकेथॉनचे आयोजन कृषी महाविद्यालय, सिंचननगर, पुणे येथे १ ते ३ जून २०२५ दरम्यान करण्यात आले होते. या हॅकेथॉनच्या आयोजनामध्ये महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे आणि कृषी महाविद्यालय पुणे यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमात १४० हून अधिक नव्या कृषी तंत्रज्ञान संकल्पनांना वाव देण्यासाठी स्टॉल्स उपलब्ध करण्यात आले होते. या हॅकेथॉनमध्ये ५५० हून अधिक स्टार्टअप्स आणि कंपन्यांनी सहभाग घेतला होता, त्यातील १५० कंपन्यांची निवड करण्यात आली होती.

हॅकेथॉनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट शेती, मातीचे आरोग्य, कृषी यांत्रिकीकरण, हवामान अंदाज, जल व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांतील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांपासून ते स्टार्टअप्सपर्यंत सर्वांनी सहभाग घेतला होता.

केंद्रीय कृषि मंत्री मा. ना. श्री. शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री मा ना श्री. देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत आज दिनांक ३ जून रोजी पुणे येथे 'पुणे ॲग्री हॅकेथॉन'च्या पारितोषिकांसाठी संस्था निवडणाऱ्या सुपर ज्युरी, ज्युरी आणि इनक्युबेशन पार्टनर्स यांचा पुरस्कार देऊन सत्कार केला. यावेळी उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजित पवार, मंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत पाटील, कृषि मंत्री मा. ना. श्री. माणिकराव कोकाटे, मंत्री मा. ना. श्री. भरत गोगावले, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांना सुपर ज्युरी म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख, माजी कुलगुरू डॉ. आर. बी. देशमुख, माजी कृषी आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, नॅचरल शुगरचे अध्यक्ष श्री बी. बी. ठोंबरे आणि सह्याद्री फार्मचे अध्यक्ष विलास शिंदे यांचाही सुपर ज्युरी म्हणून सन्मान झाला.




या हॅकेथॉनमध्ये एकूण १६ बक्षिसे देण्यात आली, ज्यात पहिले बक्षिस रु २५ लाखांचे आणि दुसरे बक्षिस रु १५ लाखांचे होते. या बक्षिसांच्या माध्यमातून विजेत्या संकल्पनांना कृषी क्षेत्रात प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची संधी मिळणार आहे.

या हॅकेथॉनच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यात आले आहे, ज्यामुळे भारतीय शेतीला अधिक स्मार्ट आणि टिकाऊ बनवण्याचा मार्ग मोकळा होईल. भारतातील पहिल्या ॲग्री हॅकेथॉनचे आज दिनांक ३ जून रोजी पुण्यात यशस्वी समारोप झाला.

## सेलूत वीरशैव स्मशानभूमीत घाणीचे साम्राज्य पालिका प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी- शिवा संघटनेचे निवेदन


**सेलू,/प्रतिनिधी :** सेलूत वीरशैव स्मशानभूमीत घाणीचे साम्राज्य पालिका प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी.शिवा संघटनेचे निवेदन देण्यात आले आहे.

शहरातील सर्व्हे नंबर ३३ मधील वीरशैव स्मशानभूमी लगत असलेल्या नाला उपसण्याचे काम जेसीबीच्या सहाय्याने न.प.कडून केले जात आहे. त्यामुळे नाल्याचे पाणी स्मशानभूमीत घुसल्याने जागोजागी खड्डे पडून पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरत आहे. ऐन पावसाळ्यात मयताचा अंत्यविधी कसा करावा? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याकडे नगरपालिका प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याच्या मागणीचे निवेदन मंगळवारी (दि.३) मुख्याधिकारी यांना समाजासह शिवा संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे. याकडे पालिका प्रशासन किती गांभीर्याने लक्ष देतात हा येणारा काळाच ठरवेल. स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आलेले कचऱ्याचे ढीग काढावेत, काटेरी झुडुपे साफ करावीत. नालापिचिंग करावे. स्मशानभूमीतील अंतर्गत रस्ते, सिमेंटची बाक, स्मशानभूमीला उत्तर-पश्चिम संरक्षक भिंत बांधावी. लाईट व्यवस्था करावी. ट्रॅक्टरने जागा लेव्हलिंग करून साफसफाई स्वच्छता करावी. प्रवेशद्वार बांधण्यात यावे, वृक्षारोपण करावे, सर्व्हे नंबर ३३ ची ७/१२ वर नोंद असलेली ८० आर जमिनीची मोजणी तात्काळ करावी. पुलासमोरील खड्डे बुजवून द्यावेत. बंद झालेला पाण्याचा हातपंप पुन्हा सुरू करण्यात यावा. या सर्व समस्या तात्काळ सोडवाव्यात अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर शिवकुमार नावाडे, निजलिंगअप्पा तरडगे, बबनअप्पा झमकडे, गणेश गोरे, रामा कटारे, सुजीत मिटकरी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जिंतूर तालुक्यात हळद लागवड सुरु

**जिंतूर-** तालुक्यात पाऊस हळद लागवडीस समाधानकारक झाल्यामुळे शेतकऱ्यांनी हळद प्राधान्य देऊन लागवड जोमाने करत आहेत. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी मे महिन्यातच पाऊस समाधानकारक झाला. त्यामुळे जमिनीची मशागत यांत्रिकपद्धतीने करून जमीन पेरणी योग्य केली.

हळद लागवड केली.तालुक्यातील बलासा शिवरातील शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरच्या साह्याने हळदीचे बेड ओढून त्यावर फुल्ली मारून मजुराच्या साह्याने लागवड केली तर काही शेतकऱ्यांनी टॅक्टरवरच पेरणीची सोय असलेले टॅक्टर चा उपयोग करून हळदीची लागवड केली आहे. सगळीकडे मशागतीची कामे सुरु झाल्यामुळे मजूर मिळणे कठीण झाले आहे. पावसाच्या अनियमितपणामुळे ही शेतकरी राजा अडचणीत आला आहे हें मात्र तेवढेच खरे आहे.



### शिक्षक प्रशिक्षणाला उत्साहात सुरूवात

१ हजार २१५ शिक्षकांचा सहभाग : १२ जूनपर्यंत चालणार प्रशिक्षण

**परभणी,दि.०४(प्रतिनिधी) :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व परभणी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षकांच्या वरिष्ठ आणि निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाला सोमवार ०२ जून रोजी उत्साहात सुरुवात झाली. प्रशिक्षणात यंदा प्रथमच संपूर्ण राज्यात एकाच टप्प्यात आणि एकाच वेळी राज्यस्तरीय ऑनलाइन चाचणी सोडविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

हायब्रीड आणि रियल टाइम स्वरूपातील हे प्रशिक्षण १२ जूनपर्यंत चालणार आहे. या प्रशिक्षणाकरीता परभणी जिल्ह्यातील १ हजार २१५ शिक्षकांनी नोंदणी केलेली आहे. पाथरी रोड वरील जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुल येथे ५४० आणि धर्मापुरी येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठान परिसरात ६७५ प्रशिक्षणार्थी चार गटांत दररोज सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाचपर्यंत पाच तासिकामधून प्रशिक्षण घेत आहेत. प्रत्येक तासिकेला प्रशिक्षणार्थीची उपस्थिती अनिवार्य आहे.परभणी जिल्हास्तरावर ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के, जिजाऊ ज्ञानतीर्थचे सचिव प्राचार्य नितीन लोहट आदीच्या सहकार्याने प्रशिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून इंटरॲक्टिव्ह डिजिटल बोर्डसह आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांच्यासह वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली डायटचे प्राचार्य डॉ. विकास सलगर उपस्थित होते.

## गावात प्यायला नाही पाणी आणि अर्धवट कामाची पूर्ण द्या म्हणे आमदानी

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील करंजी येथील नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती थांबविण्यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा जल जीवन मिशन अंतर्गत गावामध्ये सन २०२२ मध्ये मंजूर झालेल्या १ कोटी ३ लक्ष रुपयांच्या पिण्याच्या पाण्याची टाकी बांधकाम कामात व विहीर खोद कामात व पाईप लाईन खोद कामात व गावातील पाईप लाईन मध्ये नित्कृष्टपणा असून बोगस काम केले असल्याच्या नागरिकांच्या तक्रारीवरून परभणी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.



पाणी पुरवठा योजना जल जीवन मिशन अंतर्गत करंजी गावामध्ये सन २०२२ साली कामं मंजूर झाले ठेकेदार श्री.भगवान बाबा कन्स्ट्रक्शन शासकीय ठेकेदार धमधम या ठेकेदारांना १ कोटी ३लक्ष १९हजार ५२६ रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली होती, त्यानुसार कंत्राटदार यांनी मुदतीमध्ये काम पूर्ण करणे अपेक्षीत होते, मात्र सद्यस्थितीला काम अपूर्ण असून पाणी पुरवठा विहिरीचे काम पूर्ण नं करता नळ पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन नालीमध्ये टाकून अर्ध्या अधिक गावाला या पाणी पुरवठा टाकीतून नळ कनेक्शन जोडले नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. सदरील या योजनेचे काम अपूर्ण असताना कंत्राटदार श्री भगवान बाबा कन्स्ट्रक्शन शासकीय ठेकेदार यांनी परभणी जिल्हा परिषद प्रशासनाला कागदोपत्री काम पूर्ण झाल्याची खोटी माहिती देऊन अर्ध्या अधिक पैसे उचलून घेतल्याची माहिती सादर तक्रार अर्जात दिली आहे.

त्यानुसार काम अपूर्ण असताना पूर्ण पैसे उचलून घेण्याची तयारी ठेकेदाराकडून होत असून शासनाच्या उदात्त हेतू योजनेला गालबोट लागले असल्याचे तक्रारदार नागरिकांचे म्हणणे आहे. यावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## नैसर्गिक सेंद्रिय शेतीची देशव्यापी चळवळ उभारण्याची गरज: सरदेशपांडे

**परभणी ,/प्रतिनिधी- :** कृत्रिम रंग, रासायनिक खते तसेच अनेक कीटकनाशकांचा मारा करुन उत्पादन वाढविणे, खर्च कमी करणे आणि पैसा मिळवणे हा जणू सध्याचा मंत्र झाला आहे. हा मंत्र अतिशय घातक आहे, यातून अन्नातील पोषणमूल्ये हरवली असून अनेक आजारांना आपण जवळ केले आहे. आपल्याला जर पोषणमूल्य असलेले अन्न, भाजीपाला हवा असेल तर परंपरागत, नैसर्गिक व शाश्वत शेतीकडे परत जाण्याशिवाय आता पर्याय उरलेला नाही. यासाठी शेतकरी आणि ग्राहकांची एक देशव्यापी चळवळ उभारावी लागेल, असे मत सेंद्रिय शेती या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांनी व्यक्त केले.

सरदेशपांडे ॲग्रो सर्व्हिसेसचे सचिन सरदेशपांडे यांच्यावतीने सरदेशपांडे ॲग्रो नर्सरी येथे मंगळवार ३ जून रोजी 'ऑरगॅनिक फ्युचर्स' कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत पुण्यातील अभिनव शेतकरी गटाचे संस्थापक आणि कृषीभूषण ज्ञानेश्वर बोडके, क्रोएशिया येथील फिटो स्मार्ट या कंपनीचे संस्थापक आणि सेंद्रिय शेतीमधील जागतिक तज्ज्ञ रॉबर्ट स्टेझायनर, सेंद्रिय गूळ या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि मुंबई आयआयटी मधील प्रा. डॉ विशाल सरदेशपांडे सहभागी झाले होते. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत परभणी, नांदेड, अहिल्यानगर, हिंगोली, वसमत येथून मोठ्याप्रमाणात शेतकरी, अभ्यासक, व्यावसायिक सहभागी झाले होते. यावेळी या तज्ज्ञांनी शेतकरीवर्गाच्या प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यशाळेत मुक्त पत्रकार प्रसाद घारे, प्रगतीशील शेतकरी सूर्या फार्मचे प्रल्हाद बोरगड, प्रगतीशील शेतकरी प्रकाश हरकल, साबळे, रमेश गोळेगावकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोडके म्हणाले, शेतकरी हा अन्नदाता आहे. हाच शेतकरीवर्ग भारतातील १४० कोटी लोकांना रोज पोटभर जेवण उपलब्ध करुन देतो. असे असले तरी शेतकरी सुखी समाधानी नाही. आपण कीटकनाशके, कृत्रिम रंग, रासायनिक खतांच्या मागे लागल्याने आपण पारंपरिक नैसर्गिक शेती विसरत चाललो आहोत. जंक फूड ने आपण अनेक आजारांना आपलेसे केले आहे. साखर ही शरिरास अतिशय घातक असून असंख्य भारतीयांना मधुमेह या आजाराने ग्रासले आहे. विषमुक्त अन्न, भाजीपाला तयार करण्यासाठी शेतकरीवर्गाने प्रामाणिक प्रयत्न करावेत. ग्राहक हाच आपला राजा आहे त्याला सेंद्रिय भाजीपाला उपलब्ध करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र यायला हवे. शेतीकडे व्यवसाय म्हणून बघतानाच मार्केटिंग, आधुनिक तंत्रज्ञान, पॅकेजिंग या नवीन गोष्टींचा स्वीकार करावा. जसा प्रत्येक कुटुंबाचा फॅमिली डॉक्टर असतो तसेच प्रत्येक कुटुंबाचा फॅमिली शेतकरी असायला हवा. पुरुषांनी शेती करावी आणि महिलांनी विक्री व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करावे. ज्याच्याकडे शेती आहे त्यांनी नोकरी करायची नाही असे ठरवावे. शेती विकली तर माणसे अन्ना शिवाय मरतील त्यामुळे शेती वाचवणे, वाढवणे महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले.

केमिकल युक्त खत, कीटकनाशक याच्या प्रचंड वापरामुळे नैसर्गिक शेती नष्ट होऊ लागली आहे ही एक प्रकारची धोक्याची घंटाच आहे. यातून वेळीच बाहेर पडण्यासाठी शाश्वत अशा सेंद्रिय शेतीची कास धरायला हवी. फिटोस्मार्ट हे उत्पादन नैसर्गिक शेतीसाठी अतिशय उपयुक्त असून यामुळे पोषणमूल्य वाढते, जमिनीचा पोत सुधारतो, पाणी कमी लागते तसेच पिकांच्या मुळांची वाढ चांगली होते. असे सांगून रॉबर्ट स्टेझायनर म्हणाले, बाजारात व्हेगन, शाकाहारी याच्या नावावर अनेक गोष्टी विकल्या जातात त्या घेताना त्या पदार्थामध्ये कोणते अन्न घटक आहेत ते बारकाईने पहावे.

प्रा. विशाल सरदेशपांडे म्हणाले, परदेशात तसेच भारतात सध्या लोकांमध्ये स्थुलपणा वाढलेला दिसतो त्यामुळेच वजन कमी करण्यावर भर दिला जातो. आपण रंग, चमक, वास असणाऱ्या जंक फूड ला आणि त्याच्या जाहिरातींना भुलतो. या पदार्थातून आपल्याला तात्पुरती ऊर्जा मिळते मात्र दिर्घकाळाचे नुकसान होते. या पदार्थात पोषणमूल्य नसते. बर्गर, पिझ्झा, प्रोसेस फूड हे पदार्थ शरिरास अतिशय घातक असतात. यातून पचनक्रिये संदर्भातील आजार निर्माण होतात. म्हणूनच = अशा पदार्थांचे सेवन करावे. सलाड खाल्याने पचनसंस्था सुधारण्यास मदत होते. भविष्यकाळाचा विचार करुन शेतकरीवर्गाने नैसर्गिक सेंद्रिय शेतीकडे वळण्याची आज नितांत आवश्यकता आहे. यासाठी एक चळवळ उभी करायला हवी, असेही प्रा. सरदेशपांडे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बनवसकर यांनी बँकींग क्षेत्रात 'लिडर' तयार केले–सुर्यकांतराव कुलकर्णी

## स्वतःच्या कर्मावर संस्कार करीत, बनवसकर यांनी ग्राहकांना दर्जेदार सेवा दिली–प्रसाददादा चिक्षे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जून**

येथील दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार वि.बनवसकर हे नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांच्या सेवापूर्तीचा सेवा गौरव सोहळा मंगळवार, दिनांक ३ जुन २०२५ रोजी गोपीनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

सेवा गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सुर्यकांतराव कुलकर्णी (कार्यकारी संचालक, एस.ई.डी.टी.पुणे.), तर यावेळी प्रमुख निमंत्रित म्हणून प्रसाददादा चिक्षे (ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई.) यांच्यासह दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट, संचालक इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य डॉ.किशन पवार, प्रा.अशोक लोमटे, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, बाळासाहेब देशपांडे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी तसेच सत्कारमूर्ती सनतकुमार वि.बनवसकर व सौ.स्वातीताई बनवसकर या मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थित होती. प्रारंभी दिपप्रज्वलन आणि भारतमाता व पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश शेळके (प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी) यांनी केले. त्यांनी सेवा गौरव सोहळा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंर बँकेच्या वतीने अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालक प्राचार्य डॉ.किशन पवार यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सनतकुमार वि.बनवसकर व सौ.स्वातीताई बनवसकर यांचा एकत्रित सन्मान करण्यात आला. सत्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, श्री विघ्नहर्ता मूर्ती, साडी–चोळी, फेटा, शाल, पुष्पगुच्छ व पुष्पहार असे होते. याप्रसंगी ज्येष्ठ बंधू ह.भ.प.शरदराव महाराज बनवसकर, सौ.प्रतिभाताई बनवसकर, मुलगा स्वराज बनवसकर यांच्यासह संपूर्ण बनवसकर परिवार, नातेवाईक आणि मित्र मंडळी उपस्थित होते. या सर्वांचा यथोचित सन्मान बँकेच्या वतीने करण्यात आला. यावेळी सुदर्शन टाक, प्रविण जोशी यांच्या वतीने सौ.प्रतिक्षा जोशी, झंवर काका, संचालक इंजि.बिपीन क्षीरसागर, श्री पेकमवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर आशिर्वादपर सदिच्छा व्यक्त करताना बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट यांनी सांगितले की, सनतकुमार बनवसकर यांनी बँकेविषयी निखळ निष्ठा ठेवली, कोणाचा अनादर केला नाही. कोणाला दुखावले नाही. प्रामाणिकपणा जोपासत समत्व बुध्दीने झोकून देऊन पण, सहकाराचे तत्व अंगिकारत, चौकटीत राहून बँकेच्या सर्वांगिण विकासासाठी निर्भयपणे कार्य केले. बनवसकर यांचा मला खूप अभिमान आहे. असे गौरवोद्गार प्राचार्य धाट यांनी काढले. तर यावेळी बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख म्हणाले की, बनवसकर यांनी कधी ही नियमबाह्य काम केले नाही. म्हणून त्यांची संपूर्ण कारकीर्द ही यशस्वी ठरली. बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी बनवसकर यांच्यासोबत काम करताना वयाचे अंतर जाणवले नाही. ते एक प्रामाणिक अधिकारी आहेत. संपूर्ण कारकीर्दीत निरपेक्ष काम केले. बँकेच्या हिताविरूध्द काम केले नाही. कारण, त्यांचा हेतू नेहमीच स्वच्छ होता. बँकेच्या सुरूवाती पासून बनवसकर यांनी अनमोल योगदान दिले असे गौरवोद्गार ॲड.पत्की यांनी काढले. सत्काराला उत्तर देताना सनतकुमार बनवसकर यांनी बँकेतील नौकरीचा पहिला दिवस ते सेवानिवृत्त झालेल्या अखेरच्या दिवसापर्यंत कार्य केले, कोणा–कोणाची मदत, सहकार्य, मार्गदर्शन लाभले याची संबंधितांच्या नांवासह माहिती



सनतकुमार बनवसकर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

दिली. कुटुंबातील आई, आत्या, ज्येष्ठ बंधू, भगिनी, पत्नी आणि मुलांचे वेळोवेळी पाठबळ मिळाले असे सांगितले. सुर्यकांत कुलकर्णी आणि संस्थापक अध्यक्ष प्राचार्य रा.गो.धाट यांच्यामुळे आपण घडलो असे सांगून २८ वर्षे बँकेचे तत्कालीन सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी, ग्राहक आणि हितचिंतक यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. काम केले पण, कोणाला उपद्रव केला नाही अशी आपली साठा उत्तराची कहाणी आहे असे बनवसकर यांनी नमूद केले. तर प्रमुख अतिथी प्रसाददादा चिक्षे यांनी अतिशय मोजक्या व नेमक्या शब्दांत बनवसकर यांचे कार्यकर्तृत्व, स्वभाव, नेतृत्वगुण, संघटन कौशल्य याबाबत भाष्य केले. बनवसकरांनी स्वतःच्या कर्मावर संस्कार करीत सोबतच्या २०० सहकाऱ्यांना घडविले, २८ वर्षे बँकेशिवाय दुसरा विचार केला नाही. ते प्रत्यक्ष बँकिंग जगले. ग्राहकांना खुष ठेवले. असे चिक्षे यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना सुर्यकांतराव कुलकर्णी म्हणाले की, आपल्या एकेकाळच्या सहकाऱ्याचा सत्कार करायला ही भाग्य लागते, बनवसकरांनी बँकेची नौकरी नव्हे तर खऱ्या अर्थाने संसार केला. नौकरीचा आनंद घेतला. प्रत्येक गोष्ट शिकून ते बँकिंग क्षेत्रातले तज्ज्ञ झाले. त्यांनी लीडर तयार केले. सहकाराचे तत्व पाळून अनेकांना फायदा करून दिला. त्यांनी जे केलं ते पुष्कळ केलं. सगळ्यांना समजून घेत, समरस होत सामावून घेतले. बँक वाढवली, मोठी केली. बँकेविषयी निष्ठा ठेवली. त्यांना मॅनेजमेंट जमली. बनवसकरांच्या कुटुंबात संत परंपरेचा संस्कार आहे. वैराग्य हे संतांचे लक्षण आहे. हे लक्षण बनवसकरांमध्ये आढळून येते. बनवसकरांसारखी माणसं वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ही मिळत नाहीत अशा शब्दांत कुलकर्णी यांनी बनवसकरांचे कौतुक केले. यावेळी सभागृहात भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, राजू मोरे यांच्यासह बँकेचे माजी संचालक, सभासद, ठेविदार, ग्राहक, हितचिंतक, विविध क्षेत्रातील मान्यवर, मराठवाड्यातील विविध बँकांचे प्रतिनिधी, महिला, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय व सन्मानपत्राचे वाचन प्रतिभा गोस्वामी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार मंगेश गोस्वामी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शांतीमंत्राने झाली. सेवापूर्तीच्या सेवा गौरव सोहळ्याच्या यशस्वितेसाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, सन्माननीय संचालक मंडळ आणि महेश शेळके (प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या समस्त अधिकारी व कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

# चैन स्नॅचींग करणाऱ्या तीन आरोपींना स्था.गु.शा.बीड ने केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जून**

दिनांक २५/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे सुमन सुरेश सारुक रा.नंदनवन कॉलनी नगर रोड बालेपीर बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, फिर्यादी हया त्यांच्या पती सोबत स्कुटी शिकण्यासाठी चऱ्हाटा फाटा ग्राऊड येथे गेल्या होत्या परत घरी जातांना फिर्यादी स्कुटीवर एकटया जात असतांना फिर्यादी याचे पाठीमागुन अनोळखी तीन इसम हे विनानंबरच्या स्कुटीवर बसुन फिर्यादी यांचे जवळ आले व फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठन व सोन्याच्या मण्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकाऊन चऱ्हाटा फाटा बीड रोड कडे निघुन गेले. या मध्ये फिर्यादी यांचे सोन्याचे एकुण २२ ग्रॅम किंमती ८८,०००/– रुपयाचा मुद्देमाल जबरी चोरी करुन घेवुन गेले होते. यावरुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरंन २९४/२०२५ कलम ३०४,३(५) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत



उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांनी अभिलेखावरील असतांना दिनांक ०४/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) प्रकाश अशोक सानप वय १९ वर्षे २) सिध्दांत अशोक जाधव वय २१ दोन्ही रा.रायमोह ३) तुकाराम लक्ष्मण कोकाटे वय १७ (विधीसंघर्षग्रस्त बालक) रा.खरगवाडी यांनी मिळुन केला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी रायमोह येथे जावुन आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर चा उघडकिस आणला आहे.

सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एक (विधीसंघर्षग्रस्त बालक) आरोपींना स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.शिवाजीनगर यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील गेलेमाल शोध पो.स्टे.शिवाजीनगर व स्थागुशा बीड करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, पोना/ बाळु सानप, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, चालक/ सिध्देश्वर मांजरे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

# दुसऱ्या मृदगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी उमेश मोहिते यांनी निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जून**

आंबाजोगाईच्या दुसऱ्या मृदगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध ग्रामीण लेखक उमेश मोहिते यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

मसाप (मराठवाडा साहित्य परिषद) शाखा आंबाजोगाईच्या वतीने दर दोन वर्षांनी ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित केले जाते, त्यास 'मृदगंध' असे नाव देणतात आले आहे.

मावळत्या अध्यक्षाने नूतन अध्यक्षांचे नाव सुचवायचे व त्यास मसाप कार्यकारिणीने एकमताने अनुमोदन दिले तर ते नाव जाहीर करण्यात येते, असा रिवाज आहे. त्यानुसार पहिल्या मृदगंध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री अमर हबीब यांनी श्री उमेश



मोहिते यांचे नाव सुचविले. त्यास मसाप आंबाजोगाईच्या कार्यकारिणीने एकमताने पाठिंबा दिला. आगामी दुसरे मृदगंध साहित्य संमेलन भावठाणा येथे ऑगस्ट महिन्यात होणार असून या संमेलनाचे स्वागताध्यक्ष मांवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया आहेत.

उमेश मोहिते हे ग्रामीण साहित्यिक असून त्यांनी बालसाहित्यही लिहिले आहे. त्यांना अनेक पुरस्कार लाभले आहेत. उमेश मोहिते हे मूळ आंबाजोगाईचे रहिवासी असून त्यांनी माजलगाव येथे शिक्षक म्हणून काम केले. निवृत्तीनंतर ते आंबाजोगाई येथे आले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल मसापचे अध्यक्ष डॉ राहुल धाकडे व स्वागताध्यक्ष अनिकेत लोहिया यांनी आनंद व्यक्त केला.

# अंबाजोगाईच्या प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जून**

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज शुक्रवार, दिनांक ६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आज शुक्रवार, दिनांक ६ जुन रोजी सकाळी १० वाजता प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथे शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे व्हिडिओद्वारे ऑनलाईन उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते बिपिनदादा क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर प्रमुख वक्ता म्हणून सामाजिक कार्यकर्ते गुरूगोविंद सोन्नर हे 'स्वदेशी विचारांचा प्रसार' या विषयावरती मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाची संकल्पना महाराष्ट्र राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री ना.मंगल प्रभात लोढा मंत्री यांची आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य पी.के.मुने, गटनिदेशक श्रीमती एस.ए.क्षीरसागर आणि शिल्प निदेशक रामदास वैरागे, शिल्प निदेशक श्रीमंत ओव्हाळ यांनी पुढाकार घेवून योगदान दिले आहे. तसेच या उपक्रमात सर्व निदेशक व कर्मचारीवृंद सहभागी आहेत.

# वडवणी पोलिसांकडून तरुण मुलांचे लग्न करून देण्याच्या बहाण्याने पैसे लूट करणारी टोळी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जून**

दिनांक ०३ जून २०२५ रोजी वडवणी पोलीस स्टेशन येथे मनीषा नरेंद्र ननावरे वय २५ वर्षे राहणार संगमनेर, ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे राहणार, संगमनेर,अहिल्यानगर हिला घेऊन आली व तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिचे घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले अशी हकीकत कथन केली, सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणी प्रभारी –झख वर्षा व्ह गाडे यांनी वैभवी व मनीषा हिची व्यवस्थित प्रेमाने चौकशी केली, तसेच सोडवणूक करणाऱ्या ड्रायव्हरला देखील बोलवून घेतले, परंतु या तिघांनाही बोलवून घेतल्यानंतर तींघांची स्वतंत्र चौकशी केली असता मनीषाचे दोन दिवसापूर्वी नुकतेच गणेश बंडू घाडगे व २८ वर्षे राहणार उपळी, वडवणी या तरुणाशी लग्न झालेले असून त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही आजारासाठी मनीष्याच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले असे कळाले, तसेच मनीषा कडे वेगवेगळे आधार कार्ड असून तिचे काका व मावशी हे देखील नकली असल्याचे समजले, लग्नासाठी मुली मिळत नसल्याने अनेक गरीब सर्वसाधारण,तसेच प्रतिष्ठित कुटुंबांना अशांचा शोध घ्यायचा, लग्न होत नसल्या तरुणांना सुंदर मुलगी दाखवणे,नंतर तिच्या आईला कॅन्सर झाला आहे, किंवा तिला आई–वडीलच नाहीत किंवा इतर आर्थिक अडचण सांगून पैसे उकळणे, व पुन्हा पैसे घेवुन पळून जाणे किंवा पळून जायला जमले नसल्यास त्याच कुटुंबा विरुद्ध पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दाखल करणे, आणि अशावेळी त्या कुटुंबाने फसवणुकीच्या तक्रारीबाबत माघार घेणे, मी पुन्हा नवीन ग्राहक शोधणे, अशी या टोळीची गुन्हे करण्याची पद्धत आहे. रणजीत अहिरे या आरोपीच्या MH-17AE 2889 मारुती सुझुकी या गाडीचा मुलगी दाखवण्यासाठी तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वापर करत असे, यामध्ये आतापर्यंत वडवणी पोलिसांनी १)वैभवी शेटे( नवरी), २) मनीषा ननावरे (नवरीची मैत्रीन) ३) रणजीत अहिरे( ड्रायव्हर) तिघेही राहणार संगमनेर अहिल्यानगर व ४)यमुनाबाई शिंदे,(मध्यस्थी) यांना अटक केली असून यात एकाच नावाचे विविध आधार कार्ड, व एक चार



चाकी असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त आहे.तरी अशा प्रकारचे प्रकरणे आल्यास त्याला बळी लग्न जुळवण्यासाठी कोणत्याही प्रकारे पैसे देऊ नये असे आव्हान बीड पोलिसांनी नागरिकांना केले आहे. ही कारवाई अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणीच्या प्रभारी अधिकारी –ळि वर्षा व्हगाडे, ीळि संजय राठोड, ीळि राजू राठोड, पुरुष अंमलदार विलास खरात, अविनाश गवळी व महिला पोलीस सुवर्णा खोसे यांनी केली.

# ट्रॅक्टॅर चोरी करणाऱ्या टोळीतील आरोपीस स्था.गु.शा.बीड ने केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जून**

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे विष्णु रामकिसन तांबडे रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड यांनी फिर्याद दिली की,दि.२६/०५/२०२५ फिर्यादी यांचा पुतण्या याने फिर्यादीच्या शेतामध्ये दिवसभर ट्रॅक्टरने शेतनांगरट करुन रात्री ०७.०० वा सुमारास ट्रॅक्टर गोठयाजवळ उभा केला होता. दि.२७/०५/२०२५ रोजी सकाळी ०६.००वा. सुमारास फिर्यादी यांचा भाऊ याने फोनकरुन सांगीतले की, काल रात्री गोठयाजवळ नांगरासह उभा केलेला ट्रॅक्टर हा गोठयाजवळ दिसत नाही. फिर्यादी याने चिंचवण– धारुर–केज भागात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. या वरुन सदरचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी केला असल्याचे फिर्यादी यांची खात्री झाल्याने पोलीस ठाणे वडवणी येथे गुरनं १४७/२०२५ कलम ३०३(२) BNS प्रमाणे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा नोंद केला होता.

मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस



निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप–निरीक्षक श्री. महेश विघ्ने यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक ०३/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) दिपक महादेव चाटे वय १९ वर्षे रा.तांबवा ता.केज.जि.बीड २) अमोल सुधाकर घायतीडक वय २१ दोन्ही रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड ३) समाधान कोंडीराम मुंढे वय २० ४) सचीन सतीष मुंढे वय–१९ वर्षे दोन्ही रा. चोंडी ता. धारुर जि.बीड यांनी मिळुन चोरला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी तांबवा येथे जावुन यातील आरोपी नामे दिपक महादेव चाटे याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्यास गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर गुन्हा उघडकिस आणला आहे. त्याचे ताब्यातुन चोरीकेलेला ट्रॅक्टर नांगरासह कि.४,३५,०००/– किंमतीचा जप्त करुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे वडवणी यांचे ताब्यात दिला आहे.सदर आरोपीस दिनांक ०५ /०६/२०२५ पर्यंतची पोलीस कोठडी सुणावण्यात आली आहे.सदर गुन्हयात एकुण चार आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एका आरोपींस स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. वडवणी यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील उर्रवरीत आरोपीचा शोध शोध पो.स्टे.वडवणी व स्थागुशा बीड करीत आहे. सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, पोअं/ अश्विनकुमार सुरवसे नेम.स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.